महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २६० वे | दिनांक : १६/०९/२०२६ | वार : बुधवार

## 'शिवसेना वाढवताय की स्वतःचा परिवार?' श्वेता महालेंचा संजय गायकवाडांवर पुन्हा हल्लाबोल




**बुलढाणा :** बुलढाणा जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून महायुतीतील दोन आमदारांमध्ये सुरू असलेला संघर्ष अद्यापही थांबताना दिसत नाही. आरोप-प्रत्यारोपांच्या फेरी झडत असतानाच, भाजप आमदार श्वेता महाले यांनी शिवसेना आमदार संजय गायकवाड यांना पुन्हा एकदा लक्ष्य केले आहे. आपण पक्ष वाढवण्याचे काम करत आहोत, असा दावा आमदार गायकवाड यांनी केला होता. मात्र त्यांच्या याच वक्तव्याचा समाचार घेत श्वेता महाले यांनी त्यांच्यावर जोरदार पलटवार केला आहे. खऱ्या शिवसैनिकांना डावलून केवळ आपली पत्नी आणि दोन्ही मुलांना जिल्ह्यातील वेगवेगळ्या ठिकाणी पाठवले जात असल्याचा आरोप आमदार महाले यांनी केला आहे. "तुम्ही शिवसेना पक्ष वाढवत आहात की स्वतःचा परिवार वाढवत आहात?" असा थेट सवाल विचारत त्यांनी गायकवाड यांना डिवचले आहे. आता श्वेता महाले यांच्या या बोचऱ्या टीकेवर आमदार संजय गायकवाड काय प्रतिक्रिया देतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार असून तूर्तास तरी हा राजकीय संघर्ष मिटण्याची कोणतीही चिन्हे दिसत नाहीत. 'हिंमत असेल तर समोरासमोर येऊन लढा' मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव आणि भाजप आमदार श्वेता महाले यांचे पती विद्याधर महाले यांच्या बुलढाण्यातील वाढदिवसाच्या कार्यक्रमात अचानक वीजपुरवठा खंडित झाला. या प्रकारामागे शिवसेना आमदार संजय गायकवाड यांचा हात असल्याचा अप्रत्यक्ष संशय व्यक्त करत श्वेता महाले यांनी त्यांना नाव न घेता 'हिंमत असेल तर समोरासमोर येऊन लढा,' असे खुले आव्हान दिले आहे. त्यांच्या या थेट आव्हानाला आमदार संजय गायकवाड यांनीही सडेतोड प्रत्युत्तर दिले असून, 'राजकारणातला बाप कोण आहे, हे आपण योग्य वेळी दाखवून देऊ,' असा जोरदार पलटवार त्यांनी केला आहे. संजय गायकवाड म्हणाले होते की, श्वेता महाले एक महिला आमदार आहे. माझी बहीण आहे, ताई आहे. मला समोर येऊन बोला म्हटल्या, बँक निवडणुकीत आम्ही सोबत होतो. एका ताटात आम्ही एका चमचाने जेवण केले. त्यामुळे समोर येण्याचा प्रश्नच नाही. वाढदिवसाला स्पर्धा करणे हा काही विषय नव्हता. त्यांनी बुलढाणामध्ये भाजप वाढवावी, आम्ही चिखलीत शिवसेना वाढवू, कशाला विरोध करता? फक्त इकडची भाजप कॉंग्रेसच्या दावणीला बांधल्या जाणार नाही, याची काळजी घ्या, असा सल्लाही गायकवाड यांनी दिला आहे.

## शाळा सोडल्यानंतरही दाखल्यातील चूक दुरुस्त करता येणार:हायकोर्टाचा विद्यार्थ्यांना मोठा दिलासा

**मुंबई :** शाळा सोडल्यानंतर शाळेच्या रेकॉर्डमध्ये किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्यात झालेली चूक दुरुस्त करता येत नाही, अशी अनेक विद्यार्थ्यांची समजूत असते. मात्र, आता अशा विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. शालेय रेकॉर्डमध्ये नजरचुकीने किंवा अनवधानाने झालेली चूक विद्यार्थी शाळा सोडल्यानंतरही नियमानुसार दुरुस्त करता येऊ शकते, असा महत्त्वपूर्ण निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या पूर्णपीठाने दिला आहे. या निर्णयामुळे शाळा सोडल्यानंतर दाखल्यावर नाव, जन्मतारीख किंवा इतर नोंदी चुकीच्या असल्याचे लक्षात आलेल्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे. केवळ संबंधित विद्यार्थ्याने शाळा सोडली आहे, या कारणावरून रेकॉर्डमधील दुरुस्ती नाकारता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे चुकीच्या नोंदीमुळे पुढील शिक्षण, नोकरी, व्यवसाय किंवा अन्य शासकीय प्रक्रियेत अडचणी येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दुरुस्तीचा मार्ग खुला झाला आहे. हा निर्णय जालना जिल्ह्यातील जनाबाई हिमतराव ठाकूर यांच्या प्रकरणातून समोर आला. त्यांच्या शाळा सोडल्याच्या प्रमाणपत्रातील नोंदीत चूक असल्याने त्यांनी ती दुरुस्त करण्यासाठी माध्यमिक शिक्षण विभागाकडे अर्ज केला होता. मात्र, त्यांनी शाळा सोडलेली असल्याने शालेय रेकॉर्डमध्ये दुरुस्ती करता येणार नाही, असे सांगत विभागाने त्यांचा अर्ज फेटाळला. यानंतर ठाकूर यांनी या निर्णयाला न्यायालयात आव्हान दिले.

## थकीत FRP साठी साखर कारखान्यांना 'सॉफ्ट लोन'; ऊस उत्पादकांना दिलासा!




**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज (15 सप्टेंबर 2026) राज्य मंत्रिमंडळाची अत्यंत महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत राज्यातील शेतकरी, पायाभूत सुविधा, प्रशासकीय सुधारणा आणि साहित्य-संस्कृती यांसारख्या विविध क्षेत्रांशी संबंधित 7 मोठे आणि महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. यामध्ये विशेषतः राज्यातील ऊस उत्पादक शेतकरी आणि अडचणीत सापडलेल्या सहकारी साखर कारखान्यांना राज्य शासनाने मोठा दिलासा दिला आहे.

मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आलेले सविस्तर आणि मुद्देसूद निर्णय खालीलप्रमाणे आहेत. राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना शासनाकडून 'सॉफ्ट लोन' (Soft Loan) उपलब्ध करून देण्याचा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे 2025-26च्या गाळप हंगामातील शेतकऱ्यांची थकीत एफआरपी (FRP) देण्यासाठी कारखान्यांना आर्थिक मदत मिळेल. तसेच, आगामी 2026-27च्या गाळप हंगामासाठी या कारखान्यांना शासनाचे भक्कम पाठबळ मिळणार असल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या ताब्यातील मौजे हरेगाव (ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर) येथील जमिनी त्यांच्या मूळ मालकांना (शेतकऱ्यांना) परत करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी 'महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम 1961' मध्ये आवश्यक सुधारणा करण्यास राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. राज्य शासनाच्या 25 प्रमुख धोरणांचे आणि 25 प्रमुख लोककल्याणकारी योजनांचे सखोल विश्लेषण व मूल्यांकन करण्यासाठी "महाराष्ट्र तांत्रिक सहाय्यता कक्ष (महा-टॅक)" स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. भारतीय व्यवस्थापन संस्था, मुंबई (IIM, Mumbai) आणि योजना व धोरणविषयक संशोधन केंद्र (CRISP) यांच्या शिफारशीनुसार हे मूल्यांकन होईल. एका वर्षाच्या या मूल्यमापन प्रकल्पामुळे शासनाच्या निर्णय प्रक्रियेत आणि योजनांच्या अंमलबजावणीत अधिक गुणवत्तापूर्ण सुधारणा करता येणार आहे. वर्धा जिल्ह्यातील आर्वी नगरपरिषदेला व्यापारी संकुल उभारण्यासाठी राज्य शासनाची 6 हजार 240.30 चौरस मीटर जमीन विनामूल्य देण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. यामुळे स्थानिक पातळीवर व्यापार आणि रोजगाराला चालना मिळेल. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नाशिक शाखेला अभ्यासिका आणि वाचनालयाच्या उभारणीसाठी मोठा दिलासा देण्यात आला आहे. नाशिक महानगरपालिकेच्या मालकीची अभ्यासिका व वाचनालय इमारत भाडेपट्ट्याने देताना, या भाडेपट्टा करारनाम्याच्या नोंदणीवरील मुद्रांक शुल्क पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १६ सप्टेंबर २०२६


## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात महिको ग्रुप टेबल टेनिस स्पर्धा संपन्न




**जालना :** सप्टेंबर रोजी बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात वार्षिक टेबल टेनिस स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेत महिको कंपनी, श्री गणपती नेत्रालय, गोल्डन जुबली स्कूल व बारवाले महाविद्यालयाचे संघ सहभागी झाले होते. पारितोषिक वितरण संस्थेचे श्री. अरुणजी अग्रवाल, ऋषिकेश नायगावकर व प्रभारी प्राचार्य डॉ. भूषण नाफडे यांच्या हस्ते झाले. पंचाची भूमिका आदित्य काळे आशिष नागरे व कुणाल काळे यांनी पार पाडली. स्पर्धेचे विजेते कर्मचाऱ्यांची मुले यामध्ये मुली- रुद्राक्षीदेशपांडे द्वितीय व खुशी जयस्वाल प्रथम, मुले- उदय दिवटे द्वितीय व विराज हिंगे प्रथम. मिश्र दुहेरी उपविजयी संघ बारवाले महाविद्यालय सोम्या शिरसमकर व डॉ. निशिकांत लोखंडे, प्राची जाधव व डॉ. कुणाल देशपांडे, मोहिनी रायबागकर व डॉ. रवींद्र शिंपी. विजय संघ गोल्डन जुबली स्कूल आर्या मगरे व रवी कचरे, प्राची अग्रवाल व दर्शील अग्रवाल, अंजली करवा व पर्व नेमामहिला उपविजेता संघ बारवाले महाविद्यालय सौम्या सिरसमकर, मोहिनी रायबागकर, प्राची जाधव, रोशनी पारवे व निकिता पारे विजेता संघ: गोल्डन जुबली स्कूल आर्या मगरे, साची गिल्डा, प्राची अग्रवाल, कनक मणियार व अनुश्री करवामेन्स उपविजेता संघ: बारवाले महाविद्यालय डॉ. कुणाल देशपांडे, डॉ. निशिकांत लोखंडे डॉ. रवींद्र शिंपी व हर्षवर्धन कोल्हे. विजेता संघ गोल्डन जुबली स्कूल रवी कचरे, पर्व नेमा, हर्ष अग्रवाल व दर्शील अग्रवाल.स्पर्धा यशस्वी होण्यासाठी डॉ. कविता प्राशर, डॉ.भिकूलाल सले, डॉ. रवींद्र शिंपी, डॉ. निशिकांत लोखंडे, डॉ. निलेश बर्डे, डॉ. कुणाल देशपांडे, अभिषेक ढंबरे, सुधीर देशपांडे, पवन देशमुख, अभिजीत भुतेकर, अनिल जाधव, सतीश सोनवणे, सुंदर वायाळ, काशिनाथ खलसे रोहन वर्तले, विलास घुमारे व प्रभुदास अडसूळ यांनी प्रयत्न केले.

## इकरा पब्लिक स्कूलमध्ये 'हिंदी दिवस' उत्साहात; कविता, कथा अन् घोषवाक्यांची मेजवानी!



**जळगाव :** येथील इकरा पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेज,जळगाव येथे 'हिंदी दिवस' अत्यंत उत्साहपूर्ण आणि मंगलमय वातावरणात मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थी व शिक्षकांनी हिंदी भाषेचे महत्त्व अधोरेखित करत तिच्याप्रती आपला आदर व्यक्त केला.कार्यक्रमाचे नेटके आणि अतिशय यशस्वी नियोजन हिंदी विभाग प्रमुख शेख अनिसा मॅडम आणि सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख आरिफ खान यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.या प्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी अतिशय उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत हिंदी भाषा आणि साहित्यावर आधारित विविध हिंदी कविता, सुविचार, प्रेरणादायी घोषवाक्ये,कथा आणि विविध साहित्यिक रचनांचे वाचन करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रम प्रसंगी अनिसा मॅडम, इश्तीयाक सर, शफीक अन्सारी आणि मोहसीन खान यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.त्यांनी रोजच्या जीवनात व राष्ट्र उभारणीत हिंदी भाषेचे असलेले महत्त्व पटवून दिले, तसेच हिंदी साहित्याशी संबंधित अनेक मनोरंजक आणि महत्त्वपूर्ण गोष्टी विद्यार्थ्यांसोबत शेअर केल्या. या संपूर्ण कार्यक्रमाचे सुरस सूत्रसंचालन आरिफ खान यांनी आपल्या उत्कृष्ट शैलीत केले, तर हा सोहळा सर्वतोपरी यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## डॉ. रफीक झकेरिया कॉलेज फॉर वुमेनमध्ये हिंदी दिवस समारोह उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न!




**छ. संभाजीनगर :** डॉ. रफीक झकेरिया कॉलेज फॉर वुमेनमध्ये प्रभारी प्राचार्या प्रो. विद्या प्रधान यांच्या मार्गदर्शनाखाली हिंदी दिवस उत्साह, अभिमान आणि सांस्कृतिक संवेदनशीलतेने साजरा करण्यात आला. समारोहाची सुरुवात कुराण पठण आणि स्वागत गीताने झाली. त्यानंतर महाविद्यालयाच्या हिंदी विभागातील डॉ. शेख लतीफ यांनी अतिथींचा परिचय करून दिला तसेच समारोहाची रूपरेषा मांडली.समारोहाचे प्रमुख वक्ते म्हणून लोकसेवा महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगरचे प्राचार्य डॉ. शेख लियाकत यांनी सांगितले की, हिंदी ही केवळ संवाद आणि अभिव्यक्तीचे माध्यम नसून भारतातील विविधतेला एका सूत्रात बांधणारी एक सशक्त कडी आहे. देशाच्या सांस्कृतिक वारशाचे, सामाजिक समरसतेचे आणि राष्ट्रीय चेतनेचे संवर्धन करण्यात हिंदीने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्यांनी सांगितले की, हिंदीचा सन्मान करणे म्हणजे आपल्या देशातील भाषिक आणि सांस्कृतिक विविधतेचा सन्मान करणे होय. युवकांनी हिंदीविषयी अभिमानाची भावना विकसित करताना तिचा आधुनिक ज्ञान-विज्ञान आणि तंत्रज्ञानाशी संबंध जोडून तिला पुढे नेण्याचा प्रयत्न करावा.या समारोहादरम्यान वरिष्ठ आणि कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी हिंदीमध्ये ओजस्वी भाषणे सादर केली तसेच एक प्रभावी नाटक सादर करण्यात आले. हे नाटक महिला विमर्श आणि हिंदीतील प्रमुख महिला लेखिकांवर आधारित होते. विद्यार्थिनींनी सादर केलेल्या कोड्यांमुळे वातावरण अधिक रंजक आणि ज्ञानवर्धक झाले. कार्यक्रमांतर्गत विद्यार्थिनींनी तयार केलेल्या भित्तीपत्रिकांचेही अनावरण करण्यात आले. या भित्तीपत्रिकांमध्ये हिंदी भाषेची विविधता, सौंदर्य आणि सामर्थ्य अधोरेखित करण्यात आले.या विशेष प्रसंगी महाविद्यालयात निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या निकालांची घोषणा हिंदी विभागाचे प्रा. मिर्झा आरेफ बेग यांनी केली. निबंध लेखन स्पर्धेत पुरस्कार प्राप्त विद्यार्थिनींचा सन्मान करण्यात आला. निबंध लेखन स्पर्धेचे निकाल पुढीलप्रमाणे आहेत.वरिष्ठ महाविद्यालयातून प्रथम क्रमांक अयमन युनुस खान, द्वितीय क्रमांक अनम शफिक सय्यद आणि तृतीय क्रमांक (संयुक्तपणे) रमीषा ऐजाज पटेल आणि सय्यदा मिस्बाह अंजुम यांनी मिळविला.कनिष्ठ महाविद्यालयातून प्रथम क्रमांक सय्यदा हुडा झरीन, द्वितीय क्रमांक जैनब ऐजाज पटेल आणि तृतीय क्रमांक (संयुक्तपणे) आयशा इसाक बाशान आणि सामिया सलीम शेख यांनी मिळविला.समारोहाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या प्रो. विद्या प्रधान यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की, हिंदी ही आपल्या भावना, विचार आणि जीवनमूल्यांना अभिव्यक्त करणारी एक सशक्त भाषा आहे. बदलत्या काळातील आणि तंत्रज्ञानाच्या युगातील आव्हानांनंतरही हिंदीने स्वतःला नव्या परिवेशानुसार घडवून घेत आपली उपयुक्तता आणि प्रासंगिकता कायम राखली आहे. त्यांनी सांगितले की, हिंदीचा विकास हा केवळ भाषेच्या विकासापुरता मर्यादित नसून, आपल्या समृद्ध सांस्कृतिक परंपरा आणि सामाजिक बांधिलकी नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे माध्यमही आहे.प्रो. विद्या प्रधान यांनी विद्यार्थिनींना आवाहन करताना सांगितले की, त्यांनी हिंदीला केवळ अभ्यासक्रमातील विषय न मानता आपल्या ज्ञानाचे, चिंतनाचे आणि सर्जनशील अभिव्यक्तीचे माध्यम बनवावे. आजच्या डिजिटल युगात हिंदीसाठी अमर्याद संधी उपलब्ध आहेत आणि युवा पिढी आपल्या प्रतिभा आणि तांत्रिक कौशल्याच्या माध्यमातून हिंदीला जागतिक व्यासपीठावर पोहोचविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकते.या समारोहास विशेषतः कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या नाझेमा मॅडम, आय.क्यू.ए.सी.चे समन्वयक प्रो. तन्मय पैठनकर, वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील अध्यापकवर्ग तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी सय्यद हुडा झरीन यांनी केले, तर आभार व कृतज्ञता ज्ञापन महाविद्यालयाच्या हिंदी विभागातील डॉ. साईबा शिरीन यांनी केले. समारोहाचा समारोप सकारात्मक ऊर्जा, हिंदी भाषेविषयी नवजागरणाची भावना आणि राष्ट्रगीताने झाला.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १६ सप्टेंबर २०२६


## अजिंक्य राठोड यांची आकर्षक बालकृष्ण रांगोळी



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** जन्माष्टमी का साजरी करतात ?धार्मिक मान्यतेनुसार कंसाच्या अत्याचाराचा अंत आणि धर्माची पुनर्स्थापना करण्यासाठी श्रीकृष्णाचा जन्म झाला. कंसाने मथुरेतील लोकांवर खूप अत्याचार केले होते. देवकीचा आठवा पुत्र आपला वध करेल, अशी भविष्यवाणी झाल्यामुळे कंसाने देवकी-वसुदेव यांना कारागृहात ठेवले. श्रीकृष्णांचा जन्म झाल्यानंतर वसुदेवांनी त्यांना सुरक्षितपणे गोकुळात नंद-यशोदांच्या घरी नेले. पुढे श्रीकृष्णांनी कंसाचा वध करून अन्यायाचा अंत केला.श्रीकृष्णांच्या जीवनातून मिळणारे संदेश :धर्म आणि सत्याचा विजय : अन्याय कितीही मोठा असला तरी शेवटी सत्याचा विजय होतो.कर्मयोगाचा संदेश : भगवद्गीतेत श्रीकृष्णांनी कर्म, कर्तव्य आणि नि:स्वार्थ भावनेचे महत्त्व सांगितले आहे.प्रेम आणि मैत्री : श्रीकृष्णांचे सुदामा, अर्जुन आणि गोकुळातील मित्रांशी असलेले संबंध प्रेम, विश्वास आणि मैत्रीचे प्रतीक मानले जातात.धैर्य आणि नेतृत्व : अडचणींना न घाबरता योग्य निर्णय घेण्याचा संदेश श्रीकृष्णांच्या जीवनातून मिळतो.समाजकल्याण : श्रीकृष्णांच्या कथांमध्ये दुर्बलांचे रक्षण आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचा संदेश दिसतो.रांगोळी क्षणचित्र : नाईक नगर, सुंदरवाडी येथील रांगोळीकार अजिंक्य राठोड यांनी तयार केलेली ही मोहक बालकृष्णाची रांगोळी जन्माष्टमीच्या निमित्ताने विशेष आकर्षण ठरली आहे. रांगोळीत श्रीकृष्णाने पडद्यामागून डोकावणारा भाव अचूक टिपला असून, रंगांची निवड आणि बारकावे कलाकाराच्या कौशल्याचे प्रदर्शन करतात.

## शिवाजी महाविद्यालय, कन्नड येथे 'आपला कन्नड तालुका' विषयावर खुली रील स्पर्धा

**कन्नड :** कन्नड तालुक्याचा ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारशाला सोशल मिडियाच्या माध्यमातून प्रसिद्धी देण्यासाठी शिवाजी महाविद्यालय, कन्नड येथील मराठी विभाग व संशोधन केंद्र, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि त्रैमासिक 'तिफण' यांच्या संयुक्त विद्यमाने कन्नड तालुकास्तरीय खुली रील स्पर्धा - २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे.या स्पर्धेचा विषय 'आपला कन्नड तालुका' असा असून स्पर्धकांनी खालीलपैकी कोणत्याही एका उप-विषयावर रील तयार करायची आहे.उप-विषय :अ) कन्नडचा इतिहास - अंतुर किल्ला, पितळखोरा लेणीब) निसर्ग पर्यटन - गौताळा अभयारण्य, अंबाडी धरण, धबधबेक) शेती, बाजारपेठ आणि ग्रामीण जीवनड) कन्नडची संस्कृती, यात्रा, लोककला व खाद्यसंस्कृती इ) कन्नड तालुक्याशी निगडित इतर कोणताही विषयही स्पर्धा कन्नड तालुक्यातील सर्व विद्यार्थी, युवक, रील क्रिएटर्स आणि नागरिकांसाठी खुली आहे.पारितोषिके :प्रथम पारितोषिक - रु. ५०१/- व सन्मान प्रमाणपत्रद्वितीय पारितोषिक - रु. ३०१/- व सन्मान प्रमाणपत्रतृतीय पारितोषिक - रु. २०१/- व सन्मान प्रमाणपत्रउत्तेजनार्थ (दोन) - रु. १०१/- व सन्मान प्रमाणपत्रविजेत्या स्पर्धकांना महाविद्यालयाच्या वार्षिक कार्यक्रमात सन्मानित करण्यात येणार आहे.स्पर्धेचे नियम :१. रील ३० ते ९० सेकंदाची व उभ्या (Vertical 9:16) आकारात असावी.२. रील स्वत: बनवलेली असावी, कॉपी केलेली रील बाद केली जाईल.३. रीलमध्ये अश्लील, जातीय किंवा राजकीय द्वेष पसरवणारा मजकूर असू नये.४. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.रील पाठवण्याची पद्धत :स्पर्धकांनी आपल्या Instagram / Facebook / YouTube रीलची लिंक ९४०४०००३९८ या व्हॉट्सअॅप क्रमांकावर पाठवावी. लिंकसोबत पूर्ण नाव, गाव व मोबाईल नंबर पाठवणे आवश्यक आहे.रील पाठवण्याची अंतिम दिनांक १५ ऑक्टोबर २०२६ आहे.या स्पर्धेत जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन मराठी विभाग प्रमुख डॉ. शिवाजी हुसे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रामचंद्र झाडे आणि प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी केले आहे.संपर्क : 9404000398

## डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयात हिंदी दिवस उत्साहात साजरा




**छत्रपती संभाजीनगर :** हिंदी ही केवळ संवादाची भाषा नसून भारतीय समाजाला विविधतेतून एकत्र जोडणारी महत्त्वाची भाषिक शक्ती आहे. बदलत्या तंत्रज्ञानाच्या आणि जागतिकीकरणाच्या युगात हिंदी भाषेचे महत्त्व अधिक व्यापक होत असून विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेचा अभ्यास, वापर आणि संवर्धन याकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे, असा संदेश हिंदी दिवसाच्या निमित्ताने देण्यात आला.डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयात हिंदी दिवस उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने राजस्थान केंद्रीय विद्यापीठ, बांदरसिंदरी, किशनगढ येथील हिंदी विभागाचे प्राध्यापक डॉ. गजानन हरिभाऊ सर्वज्ञ यांचे ‘२१व्या शतकात हिंदी भाषेचे महत्त्व’ या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अन्विता अग्रवाल होत्या. हिंदी दिवसाच्या शुभेच्छा देताना त्यांनी हिंदी भाषेचे साहित्यिक, सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थिनींनी विविध भारतीय भाषांचा सन्मान राखत हिंदी भाषेचा प्रभावी वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले.यावेळी आजीवन अध्ययन व विस्तार समितीच्या प्रमुख डॉ. मीनाक्षी देव यांच्या हस्ते प्रमुख वक्ते डॉ. गजानन सर्वज्ञ यांचा सत्कार करण्यात आला. हिंदी विभागप्रमुख डॉ. रमा दुधमांडे यांनीही डॉ. सर्वज्ञ यांचा सन्मान करून त्यांचे स्वागत केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक कनिष्ठ विभागाच्या हिंदी प्राध्यापिका डॉ. शोभा हनवते यांनी केले. हिंदी दिवसाचे औचित्य स्पष्ट करत त्यांनी विद्यार्थिनींमध्ये हिंदी भाषेविषयी प्रेम, आत्मीयता आणि अभिमानाची भावना निर्माण होण्याची गरज व्यक्त केली. यावेळी कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक प्रा. परभाणे सर यांची विशेष उपस्थिती होती.हिंदी दिवसानिमित्त कनिष्ठ विभागातील विद्यार्थिनी रेणुका दीपक जोबले आणि ईशिका रविंद्र परदेशी यांनी हिंदी भाषेच्या महत्त्वाविषयी आपले विचार व्यक्त केले. विद्यार्थिनींच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.कार्यक्रमास महाविद्यालयाच्या वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील प्राध्यापक तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पूजा मुठ्ठे यांनी केले, तर प्रा. सुचित्रा कुलकर्णी यांनी उपस्थित मान्यवर, प्राध्यापक आणि विद्यार्थिनींचे आभार मानले.हिंदी दिवसाच्या या कार्यक्रमातून हिंदी भाषेच्या समृद्ध परंपरेची जाणीव करून देतानाच नव्या पिढीने भाषेचा केवळ औपचारिक वापर न करता तिच्या साहित्यिक व सांस्कृतिक वैभवाशी नाते जोडावे, तसेच भारतीय भाषांमधील परस्पर सन्मान आणि संवाद अधिक दृढ करावा, असा विधायक संदेश देण्यात आला.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १६ सप्टेंबर २०२६


# लोककलेच्या मातीचा सुगंध जपणारा माणूस : एकनाथ त्रिभुवन (अण्णा)

छत्रपती संभाजी नगर येथे लोकलावतांचा मेळावा आयोजित केला होता या मेळाव्याचे आयोजक मा. एकनाथ त्रिभुवन(अण्णा)यांच्या कालच्या कार्यक्रमाचे एकूण अवलोकन केले असता लोक कलेच्या मातीतला सुगंध जपणारा माणूस असेच म्हणावे लागेल, काही माणसे कार्यक्रम आयोजित करीत नाहीत, तर ते परंपरा जगवत असतात.काही जण विचारपीठ उभे करीत नाहीत, तर ते मातीच्या स्मृतींना पुन्हा आवाज देतात.आणि काहींचे वय वाढत जाते; पण त्यांच्या मनातला उत्साह मात्र काळाच्या पुढे धावत राहतो.छत्रपती संभाजीनगरच्या सांस्कृतिक भूमीत असेच एक नाव गेली दोन दशके लोककलेच्या सेवेत निष्ठेने उभे आहे—माननीय एकनाथ पुंजाजी त्रिभुवनअण्णा .लोककला म्हणजे केवळ करमणूक नाही...लोककला म्हणजे गावच्या पारावर बसलेली गोष्ट.लोककला म्हणजे पिढ्यान्पिढ्या चालत आलेली स्मृती.लोककला म्हणजे शेतकऱ्याच्या घामाचा गंध, वारकऱ्याच्या टाळ-मृदंगाचा नाद, शाहिराच्या शब्दातील अंगार आणि सामान्य माणसाच्या जगण्यातील सुख-दुःखाचे प्रतिबिंब.गोंधळी गीत असो, देशभक्तीपर गीत असो, पोवाडा असो किंवा पारंपरिक लोककलेचे एखादे रूप—या कलांमध्ये महाराष्ट्राच्या लोकजीवनाचा इतिहास दडलेला आहे.पण काळ बदलतो. मनोरंजनाची साधने बदलतात. मोबाईलच्या पडद्यावर जग जवळ येते आणि आपल्या गावच्या पारावरची कला मात्र हळूहळू दूर जाऊ लागते. अशा वेळी या लोककलांना पुन्हा रंगमंच निर्माण करून देणे म्हणजे केवळ कार्यक्रम घेणे नव्हे; तर आपल्या सांस्कृतिक मुळांना पाणी घालणे होय.ही जाणीव मनात ठेवून एकनाथ त्रिभुवन अण्णा गेली वीस वर्षे छत्रपती संभाजीनगरमध्ये पारंपरिक लोककला महोत्सवाचे आयोजन करीत आहेत.त्यांच्या या प्रवासामागे प्रसिद्धीपेक्षा कलेविषयीचे प्रेम आणि कलाकारांविषयीची आस्था अधिक मोठी आहे.पंचाहत्तर वर्षांचे शरीर... पण पंचवीस वर्षांचा उत्साह!या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. प्रा. ऋषिकेश कांबळे यांनी एकनाथ त्रिभुवनअण्णा यांच्या कार्याचे कौतुक करताना एक अतिशय सुंदर निरीक्षण नोंदवले—पंचाहत्तर वर्षांचे वय असले तरी त्यांच्या कामाचा उत्साह पंचवीस वर्षांच्या तरुणालाही लाजवेल असा आहे.हे वाक्य केवळ कौतुकाचे नाही; ते त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अचूक वर्णन आहे.वय हा शरीराचा आकडा असतो;उत्साह मात्र मनाचा असतो.केस पांढरे होतात, पावले थोडी सावकाश पडतात; पण एखाद्या कार्यावर प्रेम असेल तर मन कधीच म्हातारे होत नाही. एकनाथ त्रिभुवनअण्णा यांच्या बाबतीत हेच दिसून येते.लोककलाकारांना शोधणे, त्यांना एकत्र आणणे, त्यांच्यासाठी रंगमंच निर्माण करणे, त्यांच्या कलेला समाजासमोर सन्मानाने उभे करणे—हे काम त्यांनी एका-दोन वर्षांचे नव्हे, तर दोन दशकांचे सांस्कृतिक व्रत म्हणून स्वीकारले आहे.जेव्हा सरकारही या कार्यापुढे नतमस्तक होते...या लोककला महोत्सवाचे उद्घाटन पालकमंत्री तसेच समाजकल्याण मंत्र्यांच्या उपस्थितीत झाले. उद्घाटनप्रसंगी त्यांनी एकनाथ त्रिभुवनअण्णा यांच्या कार्याचे भरभरून कौतुक केले.राज्यभरातून आलेल्या लोककलावंतांना एकाच रंगमच्यावर आणणे, पारंपरिक कलेला नवी ऊर्जा देणे आणि लोककलेच्या माध्यमातून सांस्कृतिक वातावरण निर्माण करणे—हे काम निश्चितच कौतुकास्पद आहे.कार्यक्रमात राज्याच्या विविध भागांतून आलेल्या ९० नामांकित लोककलावंतांचा सहभाग होता. त्यामुळे हे विचारपीठ एका शहरापुरते मर्यादित राहिले नाही; ते महाराष्ट्राच्या विविध लोकपरंपरांचे एक सुंदर सांस्कृतिक दालन बनले.एका बाजूला शासकीय मान्यवर, दुसऱ्या बाजूला लोककलावंत आणि मध्ये आपल्या मातीच्या कलेवर प्रेम करणारा एकनाथ त्रिभुवनअण्णा यांचा ध्यास—हे दृश्यच मनाला स्पर्शून जाणारे होते.लोककलाकारांचा सन्मान म्हणजे मातीचा सन्मानआपण मोठमोठ्या रंगमंचांवरच्या कलाकारांचे कौतुक करतो. त्यांची तिकिटे काढतो, त्यांचे कार्यक्रम पाहतो, त्यांच्या नावाने टाळ्या वाजवतो.पण गावोगावी वर्षानुवर्षे आपली कला जिवंत ठेवणाऱ्या लोककलाकारांकडे किती वेळा आपण वळून पाहतो?एखाद्या कलाकाराच्या हातातील वाद्य जुने असते; पण त्यातून निघणारा सूर शतकांचा असतो.त्याच्या अंगातील पोशाख साधा असतो; पण त्यामागे पिढ्यांची परंपरा असते.त्याच्या आवाजात कदाचित आधुनिक तंत्रज्ञानाची चमक नसते; पण त्या आवाजात मातीचा अस्सलपणा असतो.म्हणूनच अशा कलाकारांना रंगमंच देणे म्हणजे त्यांच्या कलेचा सन्मान करण्याबरोबरच आपल्या सांस्कृतिक अस्तित्वाचा सन्मान करणे होय.एकनाथ त्रिभुवनअण्णा : कार्यक्रमाच्या पाठीमागचा न दिसणारा दीपमोठ्या कार्यक्रमाच्या प्रकाशझोतात कलाकार दिसतात. मान्यवर दिसतात. विचारपीठ दिसते रंगमंच दिसतो. टाळ्यांचा कडकडाट ऐकू येतो.पण त्या प्रकाशाच्या मागे काही हात असतात—जे सतत काम करीत असतात.कलाकारांशी संपर्क, नियोजन, व्यवस्था, निमंत्रणे, मान्यवरांचे स्वागत, कार्यक्रमाची आखणी, कलाकारांना योग्य संधी मिळवून देणे... या सगळ्यामागे एक माणूस शांतपणे उभा असतो.तो म्हणजे एकनाथ त्रिभुवनअण्णा .त्यांच्या कार्याकडे पाहताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते—काही माणसांना स्वतःचा मंच मोठा करण्यापेक्षा दुसऱ्याला मंच मिळवून देण्यात समाधान मिळते.हीच खरी सामाजिक बांधिलकी आहे.शब्दांनी कार्यक्रमाला लय दिली...उद्घाटन सत्राचे सूत्रसंचालन प्रा. शिवाजी डोळसे यांनी अत्यंत उत्तम पद्धतीने केले. सूत्रसंचालन म्हणजे केवळ एका कार्यक्रमाला पुढे नेणे नव्हे; तर कार्यक्रमाच्या भावविश्वाला योग्य शब्द देणे असते. डोळसे यांनी आपल्या निवेदनातून कार्यक्रमाला सुंदर लय दिली.तर समारोपाचे सूत्रसंचालन प्रा. पंकज शिंदे यांनी केले. सुरुवातीपासून शेवटपर्यंत कलाकार, कला आणि आयोजक यांच्या कार्याला योग्य शब्दांत जोडणारे हे सूत्रसंचालन कार्यक्रमाची सांगता अधिक अर्थपूर्ण करून गेले.ही केवळ सांस्कृतिक मैफल नव्हती...त्या दिवशी रंगमंचावर केवळ लोककला सादर झाली नाही.तिथे महाराष्ट्राची माती बोलली.तिथे गावकुसाबाहेरच्या आठवणींनी आवाज मिळवला.तिथे विस्मृतीच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या परंपरांनी पुन्हा एकदा प्रकाश पाहिला.आणि या सगळ्याच्या केंद्रस्थानी होते—एकनाथ त्रिभुवनअण्णा .गेल्या वीस वर्षांपासून ते लोककलांचा हा दीप तेवत ठेवत आहेत. काळाच्या वाऱ्यांनी त्याला विझवण्याचा प्रयत्न केला तरी त्यांच्या प्रयत्नांनी त्याला पुन्हा पुन्हा उजेड दिला.म्हणून एकनाथ त्रिभुवनअण्णा यांच्याकडे केवळ कार्यक्रमाचे संयोजक म्हणून पाहणे अपुरे ठरेल.ते लोककलेचे जतन करणारे कार्यकर्ते आहेत.कलाकारांचे स्नेही आहेत.संस्कृतीचे वाहक आहेत.आणि आपल्या मातीच्या स्मृतींचे रखवालदार आहेत.पंचाहत्तर वर्षांचे वय त्यांच्या शरीरावर असेल; पण लोककलेसाठी धावणारे त्यांचे मन अजूनही पंचवीस वर्षांच्या तरुणासारखे आहे.कारण काही माणसांचे वय वाढत नाही...त्यांच्या कार्याचा इतिहास वाढत जातो.आणि त्या इतिहासात एकनाथ त्रिभुवनअण्णा यांचे नाव लोककलेच्या मातीच्या अक्षरांनी लिहिले गेले आहे.

**डॉ. बाळासाहेब लिहिणार**
**छत्रपती संभाजीनगर**

# माळीवाडा येथे पुरातन लक्ष्मीमाता मंदिराच्या भव्य सभामंडपाचे भूमिपूजन



**दौलताबाद** : माळीवाडा - दौलताबाद रस्त्यावरील ऐतिहासिक व पुरातन लक्ष्मीमाता मंदिर परिसरात भव्य सभामंडपाच्या बांधकामाचा शुभारंभ सोमवार रोजी अत्यंत उत्साहात करण्यात आला. ग्रामस्थांचा मोठा लोकसहभाग आणि स्वेच्छेने जमा केलेल्या लोकवर्गणीतून हा भव्य सभामंडप उभारण्यात येत आहे. सोमवारी सकाळी ठीक १० वाजता विधिवत पूजा करून आणि नारळ फोडून या बांधकामाचे अधिकृत भूमिपूजन पार पडले.सिमेंटच्या खांबांवर उभारणार भव्य रचनाहा नव्याने साकारण्यात येणारा सभामंडप पूर्णपणे आधुनिक आणि भक्कम स्वरूपाचा असेल. सिमेंटच्या मजबूत खांबांवर (कॉलम) सुमारे ४० बाय ६० फूट आकाराची ही भव्य वास्तू उभारली जाणार आहे. या संपूर्ण प्रकल्पासाठी अंदाजे ३० ते ४० लाख रुपयांचा खर्च अपेक्षित धरण्यात आला असून, पूर्णपणे स्थानिक ग्रामस्थ व भाविकांच्या लोकवर्गणीतून जमा केला जात आहे.मंदिराचे धार्मिक व सामाजिक महत्त्वलक्ष्मीमाता मंदिर हे परिसरातील भाविकांचे मोठे श्रद्धास्थान आहे. पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे पाडव्याला येथे पारंपरिक 'बारा गाड्यांची यात्रा' भरते, ज्याला हजारो भाविक हजेरी लावतात. या भूमिपूजन सोहळ्याप्रसंगी तलाठी आसाराम हेकडे, चंद्रकांत हेकडे, बाबासाहेब मुळे, कडू कोर्तीकर, धम्मपाल गायकवाड, नितीन वानखेडे, नारायण मुळे, बाळू महाराज बनसोडे, दत्तू मुळे, गणेश आस्वार, सुधाकर हेकडे, रमेश आस्वार, बाळू जगधने आदींसह माळीवाडा व परिसरातील ग्रामस्थ आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


Education of the Day

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुर्वणसंधी

B.A.(मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903


# श्रीमती कुसुमबाई प्रभाकरराव घुगे मा. सरपंच केहाळ यांचे निधन



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** : श्री संदीप प्रभाकरराव घुगे संचालक वी.का.से. मर्या. केहाळ तथा मा. जिल्हा उपाध्यक्ष भाजपा युवा मोर्चा परभणी यांच्या मातोश्री श्रीमती कुसुम प्रभाकरराव घुगे मा. सरपंच केहाळ यांचे वयाच्या ७४ व्या वर्षी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार कार्यक्रम आज संध्याकाळी ५.०० वाजता त्यांच्या मुळ गावी केहाळ येथे करण्यात आले. त्यांच्या पश्चात 3 मुली व 1 मुलगा, नातवंड असा परिवार आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १६ सप्टेंबर २०२६

## अक्षरांच्या तेजाने

अज्ञान दूर करण्यासाठी,
ज्ञानाचा दिवा घरोघरी लावू.
ज्ञानवंताच्या गरजेपोटी,
आपण सारे मदतीस जावू. १

ज्ञानवंत सारे एकत्र येऊन,
अज्ञान जाळण्याचे काम करू.
एकमेकांच्या उन्नतीसाठी,
आनंदाने मदतीचा हात धरू. २

अक्षरांच्या या ज्योतीने,
अज्ञानाचा अंध:कार जाळू.
आनंदाने सर्वजण मिळून,
संविधानाचे नियम पाळू. ३

आपण सारे भाऊ भाऊ,
मिळून मिसळून एकत्र राहू.
देश हिताचे काम करतांना,
सुजलाम सुफलाम देश पाहू. ४

सुख दु:खात एकत्र येऊन,
एकतेने,समतेने वाटून खाऊ.
अक्षरांच्या या दिव्य तेजाने,
घरोघरी प्रकाशाचे गीत गाऊ.५



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो. ८८३०६३५६९१**

प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103

# पुस्तकपेटी उपक्रमाची प्रेरणादायी भेट



वाचन संस्कृती टिकवणे आणि ती वाढवणे हे आजच्या काळात एक आव्हानात्मक, किंबहुना तपश्चर्येचेच काम झाले आहे. एका हातात अख्खे जग सामावणाऱ्या मोबाईलच्या आभासी आणि झगमगत्या दुनियेत आजची पिढी हरवून गेली आहे. अंगठ्याच्या एका स्पर्शावर रील्स, गेम्स आणि क्षणिक आनंद देणारे कंटेंट उपलब्ध असताना, एखाद्या पुस्तकाची पाने चाळत बसण्याचा संयम आजच्या मुलांमध्ये उरला आहे का, असा प्रश्न अनेकदा पडतो. अशा काळातही काही माणसे मात्र न थकता, न थांबता अक्षरांचा हा दिवा तेवत ठेवण्यासाठी धडपडत आहेत. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात अशी वेडी, अवलिया माणसे आपापल्या परीने वाचन चळवळीचे काम करत आहेत. अशाच एका अवलियाची भेट आम्हाला घडली आणि ती भेट म्हणजे खऱ्या अर्थाने अक्षरवाटेवरची आनंद पर्वणीच ठरली.आमचे सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय, कन्नड ही केवळ पुस्तकांची इमारत नाही, तर ती एक चळवळ आहे. वाचनालयाचे अध्यक्ष मा. मानसिंहजी पवार साहेब यांची एक दूरदृष्टी आहे. वाचनालयाने फक्त चार भिंतीत पुस्तके ठेवून वाचकांची वाट पाहत बसू नये, तर वाचकांपर्यंत, विशेषतः नव्या पिढीपर्यंत स्वतःहून पोहोचले पाहिजे. या विचारातूनच त्यांनी एक स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे. दरवर्षी वाचनालयाच्या कोअर कमिटीचा एक अभ्यासदौरा आयोजित केला जातो. हा दौरा म्हणजे पर्यटन नाही. तर राज्यभरात वाचन चळवळीत जे नवनवे, अभिनव प्रयोग सुरू आहेत, ते प्रत्यक्ष जाऊन समजून घेणे, त्या कार्यकर्त्यांशी संवाद साधणे आणि तो अनुभव आपल्या कन्नड तालुक्यात कसा राबवता येईल याचा आराखडा तयार करणे, हा त्यामागचा उद्देश असतो. मा. पवार साहेबांच्या मार्गदर्शनाखाली आणि त्यांच्या संकल्पनेतून आम्ही यापूर्वीही राज्यातील अनेक नामांकित वाचनालये, ग्रंथ चळवळीतील कार्यकर्ते यांना भेटी दिल्या आहेत. प्रत्येक भेट आम्हाला अधिक समृद्ध करून जाते.याच परंपरेतील आमचा मागील वर्षीचा अभ्यासदौरा होता दि. २७ सप्टेंबर २०२५ रोजी. स्थळ होते अंबेजोगाई. भेट होती वाचन चळवळीतील एका प्रकाशमान नावाला - श्री. अभिजीत जोंधळे यांना. त्यांच्या राहत्या घरीच आम्ही त्यांची भेट घेतली. घरात पाऊल टाकताच जाणवले, इथे भिंतींना पुस्तकांचा गंध आहे. पुस्तकपेटी - साधी कल्पना, मोठा परिणामअभिजीत जोंधळे हे नाव आज महाराष्ट्राच्या वाचन चळवळीत अत्यंत आदराने आणि आपुलकीने घेतले जाते. त्यांनी शालेय विद्यार्थ्यांना पुन्हा वाचनाकडे वळवण्यासाठी 'पुस्तकपेटी' हा जो अभिनव उपक्रम सुरू केला आहे, तो खरोखरच क्रांतिकारी आहे.या उपक्रमाचे स्वरूप अतिशय साधे, कमी खर्चाचे पण परिणामकारक आहे. एका लाकडी किंवा लोखंडी पेटीत ५० ते १०० निवडक, दर्जेदार, मुलांना आवडतील अशी पुस्तके ठेवली जातात. यात गोष्टीची पुस्तके, चरित्रे, विज्ञानकथा, कविता, चित्रकथांसह मुलांच्या वयाला साजेसे साहित्य असते. महत्त्वाचे म्हणजे ही पेटी कोणत्याही शासकीय अनुदानातून नाही, तर लोकसहभागातून, पुस्तकप्रेमींनी दिलेल्या देणगीतून उभी केली जाते.ही पेटी नंतर ग्रामीण भागातील एखाद्या जिल्हा परिषदेच्या शाळेत, जिथे ग्रंथालयाची सोय नाही किंवा आहे पण पुस्तके नाहीत, अशा गरजू शाळेत तीन ते चार महिन्यांसाठी ठेवली जाते. वर्गातीलच एक हुशार आणि वाचनवेडा विद्यार्थी त्या पेटीचा 'ग्रंथपाल' बनतो. त्याच्याकडे तिची चावी असते. मधल्या सुट्टीत, रिकामा तास असेल तेव्हा, शाळा सुटल्यानंतर मुले त्या पेटीभोवती जमा होतात. पुस्तके वाचतात, एकमेकांना गोष्ट सांगतात, त्यावर चर्चा करतात.ठराविक कालावधीनंतर ही पेटी तिथून दुसऱ्या शाळेत प्रवास करते. पण ती रिकामी जात नाही. त्या शाळेतील मुलांनी लिहिलेली पत्रे, त्यांचे अनुभव, त्यांनी काढलेली चित्रे सोबत घेऊन ती पुढच्या शाळेत जाते. म्हणजे ती फक्त पुस्तकांची पेटी राहत नाही, तर ती मुलांच्या भावभावनांची, त्यांच्या प्रतिभेची पेटी बनते.जोंधळे सर म्हणाले, "पुस्तके कपाटात बंदिस्त राहण्यासाठी नाहीत, तर ती मुलांच्या हातात खेळली पाहिजेत, चुरगळली पाहिजेत." या एका विचाराने आमच्या मनात घर केले. या उपक्रमामुळे बीडसारख्या ग्रामीण भागातील शेकडो शाळांमध्ये जिथे कधीच ग्रंथालय नव्हते, तिथे वाचनाची गंगा पोहोचली आहे. त्यांनी या उपक्रमातील अडचणी, सुरुवातीला आलेला लोकांचा अविश्वास आणि नंतर मुलांच्या डोळ्यात दिसलेला आनंदाचे गोड अनुभव आमच्याशी मनमोकळेपणाने शेअर केले.अनुराग पुस्तकालय - वाचकांची पंढरीत्यांच्या कार्याचा आणखी एक महत्त्वाचा आणि आम्हाला भावलेला टप्पा म्हणजे 'अनुराग पुस्तकालय'. अंबेजोगाईतील हे ठिकाण म्हणजे केवळ पुस्तक विक्रीचे दुकान नाही, तर तो वाचकांसाठीचा एक अड्डा आहे, एक हक्काचे घर आहे, वाचकांची पंढरीच आहे.आजकाल पुस्तकांच्या दुकानात बेस्टसेलर आणि अभ्यासाची पुस्तके यापलीकडे काही मिळत नाही. पण अनुरागमध्ये वेगळेच जग आहे. तिथे आंबेडकरी, पुरोगामी, समाजवादी चळवळीतील दुर्मिळ पुस्तके अतिशय जतनपूर्वक ठेवली आहेत. लहान मुलांसाठीचे दर्जेदार साहित्य, त्यांचे विश्व समृद्ध करणारी पुस्तके तिथे आहेत. कोणते पुस्तक कोणत्या वयाच्या मुलासाठी योग्य आहे, हे जोंधळे सर इतक्या आत्मीयतेने सांगतात की पुस्तक विकत घेणारा वाचक समृद्ध होऊनच बाहेर पडतो. आम्हीही आमच्या कन्नड येथील वाचनालयासाठी आणि आमच्या वैयक्तिक संग्रहासाठी तिथून काही निवडक आणि दुर्मिळ पुस्तके आवर्जून खरेदी केली.अंबेजोगाईहून कन्नडकडे परतताना आमच्या गाडीत पुस्तकांसोबतच एक नवी ऊर्जा आणि नवा संकल्प होता. आज सगळीकडे नकारात्मकता, निराशा आणि वैफल्याचे वातावरण असताना, अभिजीत जोंधळे यांच्यासारखी माणसे भेटली की विधायक काम करण्याचा उत्साह द्विगुणित होतो. कोणतीही प्रसिद्धीची हाव न ठेवता, कोणत्याही मोठ्या पुरस्काराची अपेक्षा न करता, केवळ वाचन संस्कृतीसाठी झपाटल्यासारखे काम करणारी ही माणसे हीच खरी महाराष्ट्राची वैभवशाली परंपरा आहे.अभिजीत जोंधळे यांच्यासारखी माणसे पुन्हा पुन्हा भेटली पाहिजेत, त्यांचे काम समजून घेतले पाहिजे, कारण तीच माणसे आजच्या मोबाईलच्या काळोखात अक्षरवाटेवरचा दिवा तेवत ठेवत आहेत. तीच या पिढीला पुन्हा पुस्तकांच्या जवळ आणत आहेत.

**डॉ. शिवाजी हुसे**
**कन्नड**
**मो.** +91 94040 00398


प्रतिनिधी नेमणे आहे
महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.
दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १६ सप्टेंबर २०२६

# भक्ती आणि सूफी परंपरा : मध्ययुगीन भारतातील सांस्कृतिक संवादाची कहाणी




कबीरांचे दोहे ऐकताना अनेकदा एक प्रश्न मनात येतो हा संत नेमका हिंदू होता की मुसलमान? “मोको कहाँ ढूँढे रे बंदे, मैं तो तेरे पास में” असे सांगणारा कबीर ईश्वराला मंदिराच्या चौकटीतही बंदिस्त करत नाही आणि मशिदीच्या भिंतीतही शोधत नाही. ईश्वर बाहेर नसून माणसाच्या अंत:करणात आहे, हा त्यांचा आग्रह होता.कबीरांच्या या विचारविश्वातच मध्ययुगीन भारताच्या धार्मिक आणि सांस्कृतिक इतिहासातील एक महत्त्वाचा प्रश्न दडलेला आहे भक्ती आणि सूफी परंपरांचे परस्पर नाते नेमके कसे होते? हा प्रश्न केवळ दोन धार्मिक परंपरांमधील साम्य शोधण्याचा नाही तर मध्ययुगीन भारतात घडत असलेल्या व्यापक सामाजिक आणि सांस्कृतिक संवादाला समजून घेण्याचा आहे.भक्ती चळवळीचा उगम भारतात इस्लामच्या आगमनानंतर झाला, असे मानणे ऐतिहासिकदृष्ट्या योग्य ठरणार नाही. भक्तीची सुदृढ परंपरा दक्षिण भारतात इस्लामच्या आगमनापूर्वीच विकसित झाली होती. तमिळ प्रदेशातील आळवार आणि नायनार संतांनी सहाव्या-सातव्या शतकात आपल्या भक्तिपर काव्यातून ईश्वराशी व्यक्तिगत आणि भावनिक नाते व्यक्त केले. या परंपरेत भक्ती ही केवळ कर्मकांड नसून ईश्वराशी थेट संबंध प्रस्थापित करण्याचा मार्ग बनली.पुढील काळात या भक्तिपरंपरेला विविध प्रादेशिक आणि तात्त्विक रूपे प्राप्त झाली. त्यामुळे “भक्ती चळवळ” ही एकसंध, एकाच केंद्रातून निर्माण झालेली चळवळ नव्हती. वेगवेगळ्या प्रदेशांत, वेगवेगळ्या सामाजिक परिस्थितीत आणि विविध धार्मिक परंपरांच्या संपर्कातून तिचे अनेक प्रवाह विकसित झाले.मात्र मध्ययुगीन काळात भारतात इस्लामी राजसत्ता, व्यापारी संपर्क आणि विविध इस्लामी धार्मिक परंपरांचे अस्तित्व दृढ होत गेले. त्याच काळात सूफी परंपरेचे विविध प्रवाह भारतात रुजले. चिश्ती आणि सुहरावर्दी यांसारख्या सिलसिल्यांनी (गुरु-शिष्यांची परंपरागत शृंखला) भारतीय समाजाच्या धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनात आपली स्वतंत्र छाप निर्माण केली. ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती आणि निजामुद्दीन औलिया यांसारख्या सूफी संतांच्या खानकाह या केवळ आध्यात्मिक साधनेच्या जागा नव्हत्या; त्या सामाजिक संपर्क आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीचीही केंद्रे बनल्या. कबीरांच्या शब्दांतून दिसणारा संवाद पंधराव्या-सोळाव्या शतकात उत्तर भारतात निर्गुण भक्तीच्या परंपरेला विशेष बहर आला. कबीर, रविदास, गुरु नानक, दादू यांसारख्या संतांच्या विचारांत निराकार ईश्वर, अंतर्मुख साधना आणि बाह्य कर्मकांडांवरील टीका यांना महत्त्व प्राप्त झाले.या विचारांमध्ये सूफी परंपरेशी काही लक्षणीय साम्य निश्चितच दिसते. मात्र साम्य दिसते म्हणून एका परंपरेने दुसऱ्या परंपरेवर थेट प्रभाव टाकला, असा निष्कर्ष ताबडतोब काढता येत नाही. कारण निराकार साधना, अंतर्मुखता आणि कर्मकांडावरील टीका या कल्पना भारतीय नाथ, सिद्ध आणि इतर धार्मिक परंपरांमध्येही पूर्वीपासून अस्तित्वात होत्या.कबीरांचे वैशिष्ट्य मात्र त्यांच्या भाषेत आणि दृष्टिकोनात होते. त्यांनी हिंदू आणि इस्लामी दोन्ही धार्मिक परिभाषांचा वापर केला आणि दोन्ही परंपरांतील बाह्य कर्मकांड, धार्मिक दांभिकता आणि रूढीवादावर टीका केली. त्यामुळे कबीर हे केवळ एखाद्या एका धार्मिक परंपरेचे प्रतिनिधी न राहता मध्ययुगीन भारतातील व्यापक सांस्कृतिक संवादाचे महत्त्वाचे प्रतीक ठरतात. संवाद म्हणजे केवळ प्रभाव नव्हे भक्ती आणि सूफी परंपरांच्या संबंधांकडे पाहताना एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे. इतिहासात सांस्कृतिक संपर्क झाला म्हणजे एक परंपरा दुसरीकडून सर्व काही स्वीकारते, असे नसते. अनेकदा दोन परंपरा एकमेकींच्या संपर्कात येतात, काही कल्पनांमध्ये साम्य निर्माण होते, काही गोष्टी स्वीकारल्या जातात, काही नाकारल्या जातात आणि काही कल्पना स्वतंत्रपणे विकसित होत राहतात.भक्ती आणि सूफी परंपरांच्या बाबतीतही असेच दिसते. दोन्ही परंपरांनी ईश्वराशी व्यक्तिगत नाते, प्रेम, अंत:करणाची शुद्धता आणि बाह्य आडंबरापेक्षा आध्यात्मिक अनुभवाला महत्त्व दिले. या साम्यामुळे दोन्ही परंपरांमध्ये संवादाची शक्यता निर्माण झाली. परंतु या साम्याचे संपूर्ण स्पष्टीकरण केवळ “इस्लामी प्रभाव” किंवा “भारतीय परंपरेची स्वतंत्र निर्मिती” या दोन टोकांच्या भूमिकांतून करता येणार नाही.याशिवाय मध्ययुगीन भारतातील बदलती सामाजिक-आर्थिक परिस्थिती, वाढते नागरीकरण, व्यापारी वर्गाचा विस्तार आणि नवीन सामाजिक समूहांचा उदय यांचाही धार्मिक विचारांच्या परिवर्तनावर परिणाम झाला. त्यामुळे भक्तीच्या उदयाकडे एका कारणाच्या चौकटीतून पाहण्याऐवजी अनेक घटकांच्या परस्परसंवादातून पाहणे अधिक योग्य ठरेल. भाषा आणि संगीत : संवादाची जिवंत माध्यमे भक्ती आणि सूफी परंपरांमधील सांस्कृतिक संवादाचा सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे लोकभाषांचा स्वीकार. संस्कृत किंवा अरबी-फारसीसारख्या अभिजनांच्या भाषांपुरता धार्मिक विचार मर्यादित न ठेवता संतांनी लोकांच्या भाषेत आपले विचार मांडले. हिंदीच्या विविध बोली, ब्रज, अवधी, पंजाबी, उर्दू ,मराठी आणि इतर प्रादेशिक भाषांमधून भक्तीचा संदेश सामान्य लोकांपर्यंत पोहोचला.सूफी संतांनीही स्थानिक भाषिक आणि सांस्कृतिक वातावरणाशी संवाद साधला. त्यामुळे धार्मिक अनुभव हा केवळ ग्रंथांचा विषय न राहता लोकजीवनाचा भाग बनला.संगीतानेही या संवादाला महत्त्वाचे माध्यम उपलब्ध करून दिले. भजन, कीर्तन, कव्वाली आणि विविध लोकसंगीत परंपरांनी आध्यात्मिक अनुभवाला सामुदायिक अभिव्यक्ती दिली. धार्मिक संदेश जेव्हा लोकांच्या परिचित भाषेत आणि परिचित सांस्कृतिक माध्यमांतून व्यक्त झाला, तेव्हा त्याने समाजातील व्यापक स्तरांना स्पर्श केला. संघर्षाच्या पलीकडचे मध्ययुग मध्ययुगीन भारताचा इतिहास अनेकदा केवळ राजकीय संघर्ष, धार्मिक संघर्ष किंवा सत्तास्पर्धेच्या चौकटीत मांडला जातो. परंतु या इतिहासाचे दुसरेही एक महत्त्वाचे रूप आहे ते म्हणजे दैनंदिन जीवनातील संपर्क, सहअस्तित्व आणि सांस्कृतिक देवाणघेवाण.गावे, बाजारपेठा, शहरे, यात्रास्थळे, खानकाह आणि धार्मिक केंद्रे ही केवळ स्वतंत्र धार्मिक समुदायांची ठिकाणे नव्हती. या जागांवर विविध समुदायांचे लोक एकमेकांच्या संपर्कात येत होते. अशा संपर्कातून भाषेत, संगीतामध्ये, लोकपरंपरांमध्ये आणि धार्मिक अभिव्यक्तींमध्ये परस्पर देवाणघेवाण होत होती.याचा अर्थ मध्ययुगीन भारतात धार्मिक संघर्ष नव्हते, असा अजिबात नाही. संघर्षही होते, मतभेदही होते आणि धार्मिक स्पर्धाही होती. पण त्याचबरोबर संवादही होता. इतिहासाचे वास्तव याच अनेक स्तरांच्या सहअस्तित्वात दडलेले आहे. आजच्या काळासाठी मध्ययुगीन भारताचा धडा आज भक्ती आणि सूफी परंपरांकडे पाहताना दोन टोकाच्या भूमिका दिसतात. एका बाजूला भक्तीला पूर्णपणे “शुद्ध भारतीय” आणि बाह्य प्रभावांपासून अलिप्त परंपरा म्हणून पाहण्याचा आग्रह असतो तर दुसऱ्या बाजूला तिच्या अनेक प्रवाहांचे स्पष्टीकरण केवळ इस्लामी किंवा सूफी प्रभावातून करण्याचा प्रयत्न केला जातो.दोन्ही दृष्टिकोन इतिहासाची गुंतागुंत कमी करतात.भक्तीची मुळे भारतीय धार्मिक परंपरांमध्ये खोलवर रुजलेली होती, हे जितके खरे आहे, तितकेच मध्ययुगीन भारतात भक्ती आणि सूफी परंपरांमध्ये विविध पातळ्यांवर संपर्क आणि सांस्कृतिक संवाद झाला, हेही नाकारता येत नाही. हा संवाद केवळ प्रभावाचा नव्हता; त्यात साम्य होते, देवाणघेवाण होती, स्पर्धा होती, स्वीकार होता आणि स्वतंत्र विकासही होता.म्हणून भक्ती आणि सूफी परंपरांकडे “कोणाचा कोणावर प्रभाव होता?” या एका प्रश्नातून पाहण्यापेक्षा “या परंपरांनी एकमेकांच्या सहवासात भारतीय समाजाच्या सांस्कृतिक जगाला कसे बदलले?” हा प्रश्न अधिक अर्थपूर्ण ठरतो. कबीरांचे शब्द आजही म्हणूनच महत्त्वाचे वाटतात. “मोको कहाँ ढूँढे रे बंदे, मैं तो तेरे पास में” या ओळींमध्ये केवळ एका संताचा आध्यात्मिक संदेश नाही तर मध्ययुगीन भारताच्या सांस्कृतिक इतिहासाचीही एक झलक आहे. मंदिर आणि मशीद यांच्या पलीकडे माणसाला डणाऱ्या अनुभवाचा शोध घेणारी ही परंपरा होती. तिच्या केंद्रस्थानी संघर्षापेक्षा संवाद, विभाजनापेक्षा मानवी अनुभव आणि रूढ चौकटींपेक्षा अंतर्मुखतेला अधिक महत्त्व होते.भक्ती आणि सूफी परंपरांची कहाणी म्हणूनच दोन धर्मांच्या भेटीची साधी कहाणी नाही. ती भारताच्या सामाजिक-सांस्कृतिक इतिहासातील सतत चालत राहिलेल्या संवादाची, देवाणघेवाणीची आणि नव्या सांस्कृतिक रूपांच्या निर्मितीची कहाणी आहे.



**शेख इरफान अय्युब**
**(सहा.प्राध्यापक इतिहास विभाग)**
**डॉ. रफिक झकेरिया कॉलेज फॉर वुमेन**
**छत्रपती संभाजीनगर,४३१००१**
**ईमेल- iasirfan82@gmail.com**

**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १६ सप्टेंबर २०२६

# पेरियार : स्वाभिमानातून समतेकडे

१७ सप्टेंबर हा दक्षिण भारताच्या सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासातील एका असामान्य समाजसुधारकाच्या स्मरणाचा दिवस आहे. १७ सप्टेंबर १८७९ रोजी तामिळनाडूतील इरोड येथे ईरोड वेंकटप्पा रामासामी यांचा जन्म झाला. पुढे ते 'पेरियार' या नावाने प्रसिद्ध झाले. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात भारतीय समाज जात, अस्पृश्यता, सामाजिक उतरंड, स्त्रीविषमता, अंधश्रद्धा आणि जन्माधिष्ठित श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या गुंतागुंतीच्या प्रश्नांना सामोरा जात होता. या पार्श्वभूमीवर पेरियारांनी प्रस्थापित सामाजिक व्यवस्थेला मूलभूत प्रश्न विचारले. माणसाचे मूल्य त्याच्या जन्मावर ठरता कामा नये, प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे, स्त्री-पुरुष समानता ही सामाजिक प्रगतीची पूर्वअट आहे आणि कोणतीही सामाजिक प्रथा विवेकाच्या कसोटीवर तपासली पाहिजे, हा त्यांच्या विचारांचा गाभा होता. म्हणूनच पेरियारांचे कार्य एका व्यक्तीचे चरित्र म्हणून नव्हे, तर सामाजिक स्वाभिमान, विवेकवाद आणि समतेसाठी झालेल्या दीर्घ संघर्षाचा एक महत्त्वपूर्ण अध्याय म्हणून पाहावे लागते.पेरियारांचा जन्म आर्थिकदृष्ट्या सक्षम कुटुंबात झाला. त्यांचे औपचारिक शिक्षण मर्यादित राहिले; मात्र प्रत्यक्ष जीवनातील अनुभवांनी त्यांना समाजाचे वास्तव समजून घेण्याची संधी दिली. व्यवसाय, सार्वजनिक व्यवहार आणि सामाजिक संपर्कातून त्यांनी समाजातील विविध स्तरांतील विषमता जवळून पाहिली. जन्माच्या आधारे माणसांना वेगवेगळे सामाजिक स्थान देणारी व्यवस्था, काही समूहांना विशेषाधिकार देणाऱ्या रूढी आणि काही समूहांना सार्वजनिक जीवनापासून दूर ठेवणाऱ्या प्रथा यामुळे त्यांच्या मनात प्रश्न निर्माण झाले. परंपरा ही स्वतःमध्ये सत्य किंवा न्यायाची हमी देत नाही, असा विचार त्यांच्या मनात दृढ झाला. एखादी गोष्ट प्राचीन आहे, समाजात रूढ आहे किंवा तिचे समर्थन प्रभावशाली व्यक्ती करतात म्हणून ती योग्य ठरत नाही; तिचे परीक्षण तर्क, अनुभव आणि मानवी कल्याणाच्या आधारावर झाले पाहिजे, हा विवेकवादी दृष्टिकोन पुढे त्यांच्या सार्वजनिक कार्याचा प्रमुख आधार बनला.पेरियारांनी सार्वजनिक जीवनात प्रवेश केल्यानंतर सामाजिक सुधारणेच्या प्रश्नांबरोबरच राष्ट्रीय राजकारणातही सहभाग घेतला. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये सहभागी होऊन त्यांनी स्वदेशी, खादी, मद्यविरोध आणि अस्पृश्यता निर्मूलन यांसारख्या उपक्रमांत काम केले. मात्र सामाजिक प्रतिनिधित्व आणि जातीय विषमतेच्या प्रश्नांना पुरेसे महत्त्व दिले जात नसल्याची त्यांची भावना वाढत गेली. शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये समाजातील विविध घटकांना योग्य प्रतिनिधित्व मिळणे आवश्यक आहे, असा त्यांचा आग्रह होता. त्यांच्या दृष्टीने राजकीय स्वातंत्र्य आणि सामाजिक स्वातंत्र्य यांची सांगड घालणे आवश्यक होते. परकीय सत्तेपासून मुक्तता मिळाली, पण समाजातील एका व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीपेक्षा जन्मामुळे श्रेष्ठ मानले जात असेल, तर त्या समाजाची मुक्तता अपूर्ण राहते, अशी त्यांची भूमिका होती. त्यामुळे त्यांच्या सामाजिक विचारांना राजकीय स्वातंत्र्याच्या पलीकडे जाणारा व्यापक आशय प्राप्त झाला.केरळमधील वैक्कम सत्याग्रहाने पेरियारांच्या सामाजिक संघर्षाला विशेष दिशा दिली. वैक्कम येथे मंदिराभोवतालच्या सार्वजनिक रस्त्यांवर तथाकथित अस्पृश्य समाजातील लोकांना प्रवेश नाकारला जात होता. या अन्यायाविरुद्ध सुरू झालेल्या आंदोलनात पेरियारांनी सक्रिय सहभाग घेतला. सार्वजनिक रस्त्यावरून चालण्याचा अधिकारही जर जातीनुसार ठरविला जात असेल, तर समाजातील समानतेच्या कल्पनेचे वास्तव काय आहे, हा प्रश्न त्यांच्या कार्यातून ठळकपणे समोर आला. अस्पृश्यता ही केवळ सामाजिक रूढी नसून मानवी प्रतिष्ठेवर केलेला आघात आहे, अशी भूमिका त्यांनी घेतली. या संघर्षामुळे सामाजिक समतेच्या प्रश्नाला व्यापक सार्वजनिक महत्त्व प्राप्त झाले आणि पेरियारांचे नेतृत्व दक्षिण भारतातील सामाजिक न्यायाच्या चळवळीमध्ये अधिक ठळक झाले.१९२५ मध्ये पेरियारांनी स्वाभिमान चळवळीची सुरुवात केली. या चळवळीचे केंद्र होते माणसाचे स्वाभिमानपूर्ण अस्तित्व. जन्मामुळे कोणताही मनुष्य श्रेष्ठ किंवा कनिष्ठ ठरत नाही, त्यामुळे कोणत्याही व्यक्तीने सामाजिक रूढींच्या दबावाखाली स्वतःला कमी लेखू नये, असा या विचाराचा मूलभूत आशय होता. स्वाभिमान म्हणजे केवळ वैयक्तिक प्रतिष्ठेची भावना नव्हे; तर अन्यायकारक व्यवस्थेला प्रश्न विचारण्याचे धैर्य, स्वतःच्या बुद्धीवर विश्वास ठेवण्याची वृत्ती आणि समानतेसाठी उभे राहण्याची क्षमता होय. स्वाभिमान चळवळीने जातीय भेदभाव, सामाजिक उतरंड, पुरोहितशाही, स्त्रीविषमता आणि अविवेकी रूढींवर सार्वजनिक चर्चा घडवून आणली. सामान्य माणसाच्या जीवनातील प्रश्नांना सामाजिक सुधारणेच्या केंद्रस्थानी आणण्याचे कार्य या चळवळीने केले.पेरियारांच्या विचारांमध्ये जातिव्यवस्थेविरुद्धचा संघर्ष अत्यंत ठळकपणे दिसतो. जन्माच्या आधारावर व्यक्तीचे सामाजिक स्थान निश्चित करणे त्यांना मान्य नव्हते. जातीय उतरंड ही केवळ सामाजिक विभागणी नसून ती संधी, शिक्षण, सत्ता आणि प्रतिष्ठेच्या असमान वाटपाला कायम ठेवणारी व्यवस्था आहे, अशी त्यांची धारणा होती. त्यामुळे जातिभेदाचा प्रश्न केवळ वैयक्तिक वर्तनाचा प्रश्न न राहता सामाजिक संरचनेचा प्रश्न आहे, हे त्यांनी अधोरेखित केले. समाजातील प्रत्येक व्यक्तीला समान मानवी प्रतिष्ठा मिळाली पाहिजे, ही त्यांची मागणी होती. त्यांच्या जातिविरोधी भूमिकेची भाषा अनेकदा तीव्र आणि संघर्षात्मक होती. त्यामुळे त्यांच्या काही पद्धतींवर मतभेद झाले; परंतु जातीय विषमतेच्या मुळावर प्रश्न उपस्थित करण्याचे त्यांचे धैर्य भारतीय सामाजिक विचारांच्या इतिहासात महत्त्वाचे ठरते.पेरियारांच्या विचारसरणीचा दुसरा प्रमुख आधार म्हणजे विवेकवाद. कोणतीही श्रद्धा, प्रथा किंवा सामाजिक कल्पना केवळ परंपरेने चालत आली म्हणून स्वीकारू नये, असा त्यांचा आग्रह होता. माणसाने प्रश्न विचारले पाहिजेत, तर्क केला पाहिजे आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारे निष्कर्ष काढला पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती. अंधश्रद्धा आणि अवैज्ञानिक विचारांमुळे व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि सामाजिक प्रगती बाधित होऊ शकते, असे ते मानत. त्यांच्या विवेकवादाचा अर्थ केवळ धार्मिक श्रद्धांवरील टीका असा मर्यादित नव्हता; तर कोणत्याही सत्ताकेंद्राला, रूढीला किंवा सामाजिक दाव्याला चिकित्सकपणे तपासण्याची वृत्ती असा त्याचा व्यापक अर्थ होता. आज विज्ञान आणि तंत्रज्ञानाने मानवी जीवन बदलले असले तरी खोटी माहिती, अफवा, अंधश्रद्धा आणि अवैज्ञानिक दावे समाजमाध्यमांतून मोठ्या वेगाने पसरतात. त्यामुळे पेरियारांचा प्रश्न विचारण्याचा आग्रह आजही अत्यंत उपयुक्त ठरतो.स्त्री-मुक्ती हा पेरियारांच्या सामाजिक विचारांचा आणखी एक महत्त्वपूर्ण भाग होता. स्त्रीला पुरुषापेक्षा दुय्यम स्थान देणाऱ्या पितृसत्ताक सामाजिक व्यवस्थेवर त्यांनी टीका केली. स्त्रीला शिक्षण, संपत्ती, विवाह आणि स्वतःच्या जीवनाबाबत निर्णय घेण्याचा अधिकार असला पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. स्त्रीचे जीवन केवळ पत्नी आणि माता या भूमिकांमध्ये मर्यादित करता कामा नये, तर तिला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व म्हणून समान प्रतिष्ठा मिळाली पाहिजे, ही भूमिका त्यांनी मांडली. बालविवाह, हुंडा, स्त्रीशिक्षणाचा अभाव आणि विवाहातील असमानता यांसारख्या प्रश्नांवर त्यांनी आवाज उठविला. स्त्रीची आर्थिक, शैक्षणिक आणि वैचारिक स्वायत्तता वाढल्याशिवाय समाजाची प्रगती पूर्ण होऊ शकत नाही, ही जाणीव त्यांच्या विचारांमध्ये दिसून येते.विवाहसंस्थेबाबत पेरियारांनी मांडलेला दृष्टिकोन त्या काळातील सामाजिक वातावरणाच्या तुलनेत धाडसी होता. जात, सामाजिक प्रतिष्ठा आणि कर्मकांड यांच्या चौकटीत अडकलेल्या विवाहपद्धतीऐवजी दोन व्यक्तींमधील समानता, परस्पर संमती आणि स्वातंत्र्य यांना महत्त्व मिळावे, असा त्यांचा आग्रह होता. याच भूमिकेतून स्वाभिमान विवाहाची संकल्पना पुढे आली. विवाहामध्ये स्त्रीला स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्थान असावे आणि तिच्या संमतीला महत्त्व असावे, हा त्यामागील विचार होता. विवाहाच्या माध्यमातून जातीय भिंती अधिक मजबूत होऊ नयेत, तर व्यक्तिस्वातंत्र्य आणि समानतेला बळ मिळावे, अशी भूमिका त्यांनी घेतली. आज वैयक्तिक स्वातंत्र्य, आंतरजातीय विवाह, स्त्रीची निवड आणि विवाहातील समानता यांवर होत असलेल्या चर्चांच्या पार्श्वभूमीवर या विचारांकडे ऐतिहासिक संदर्भात पाहणे आवश्यक आहे.शिक्षणाच्या प्रश्नालाही पेरियारांनी सामाजिक न्यायाशी जोडले. शिक्षणापासून वंचित ठेवलेला समाज पिढ्यान्पिढ्या सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागे राहतो, हे त्यांनी अधोरेखित केले. शिक्षण व्यक्तीला केवळ रोजगार मिळविण्यासाठी सक्षम करत नाही, तर स्वतःचे अधिकार समजून घेण्याची आणि अन्यायाला प्रश्न विचारण्याची क्षमता देते. त्यामुळे शिक्षणाच्या संधी सर्वांसाठी खुल्या असाव्यात, अशी त्यांची भूमिका होती. आज भारतात शिक्षणाचा विस्तार झाला असला तरी गुणवत्तापूर्ण शिक्षणाची असमान उपलब्धता, आर्थिक अडचणी, डिजिटल दरी आणि उच्च शिक्षणातील विषमता यांसारखे प्रश्न कायम आहेत. अशा परिस्थितीत शिक्षण हे सामाजिक सक्षमीकरणाचे साधन आहे, हा पेरियारांचा दृष्टिकोन आजच्या काळातही महत्त्वाचा ठरतो.सामाजिक न्यायाच्या संदर्भात प्रतिनिधित्वाचा प्रश्न पेरियारांनी सातत्याने उपस्थित केला. समाजातील काही मोजक्या घटकांकडे शिक्षण, प्रशासन आणि सत्तेच्या संधी केंद्रित राहिल्यास लोकशाहीचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचणार नाही, असे त्यांचे मत होते. वंचित आणि मागासलेल्या समाजघटकांना शासनव्यवस्थेत योग्य प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे, हा त्यांचा आग्रह होता. प्रतिनिधित्वाचा अर्थ केवळ पदांवरील उपस्थिती नसून निर्णयप्रक्रियेत आपला आवाज पोहोचणे असा व्यापक आहे. सामाजिक न्यायामध्ये समान संधीबरोबरच ऐतिहासिकदृष्ट्या वंचित राहिलेल्या समाजघटकांना पुढे येण्यासाठी आवश्यक आधार देणेही समाविष्ट होते. या विचारामुळे पेरियारांचे कार्य सामाजिक सुधारणेपासून सामाजिक न्यायाच्या व्यापक राजकारणाकडे गेले.पेरियारांनी आपल्या विचारांचा प्रसार करण्यासाठी लेखन आणि पत्रकारितेचा प्रभावी वापर केला. नियतकालिके, पुस्तिका, सार्वजनिक सभा आणि परिषदांच्या माध्यमातून त्यांनी सामान्य जनतेपर्यंत सामाजिक प्रश्न पोहोचविले. जातिव्यवस्था, स्त्रीविषमता, अंधश्रद्धा, सामाजिक प्रतिनिधित्व आणि स्वाभिमान यांवर त्यांनी सातत्याने लिखाण केले. त्यांच्या लेखनाची भाषा अनेकदा थेट, कठोर आणि संघर्षशील होती. त्यांच्या मते सामाजिक परिवर्तनासाठी केवळ बौद्धिक चर्चा पुरेशी नाही; सामान्य माणसाच्या विचारविश्वात बदल झाला पाहिजे. त्यामुळे त्यांनी सामाजिक प्रबोधनाला संघटनात्मक चळवळीची जोड दिली. विचार लोकांपर्यंत पोहोचविणे आणि त्या विचारांच्या आधारे सामाजिक कृती निर्माण करणे, हे त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य होते.पुढे पेरियार द्रविडी सामाजिक चळवळीचे प्रमुख वैचारिक नेतृत्व बनले. १९४४ मध्ये त्यांच्या नेतृत्वाखाली द्रविडर कळघमची स्थापना झाली. सामाजिक न्याय, जातिविरोध, स्वाभिमान, विवेकवाद आणि सामाजिक प्रतिनिधित्व या प्रश्नांना त्यांनी चळवळीच्या केंद्रस्थानी ठेवले. तामिळनाडूच्या पुढील सामाजिक आणि राजकीय प्रवाहांवर त्यांच्या विचारांचा व्यापक प्रभाव पडला. द्रविडी राजकारणाच्या सामाजिक पायाभरणीत पेरियारांचे योगदान महत्त्वाचे मानले जाते. मात्र, त्यांच्या विचारांचा प्रभाव समजून घेताना त्यांच्या कार्याचे प्रादेशिक आणि ऐतिहासिक संदर्भ लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यांच्या चळवळीने दक्षिण भारतातील सामाजिक प्रश्नांना व्यापक राजकीय अभिव्यक्ती मिळवून दिली, हे त्यांच्या कार्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.पेरियारांचे मूल्यमापन करताना त्यांच्या विचारांतील वादग्रस्त पैलूंकडेही चिकित्सकपणे पाहणे आवश्यक आहे. धर्म आणि धार्मिक परंपरांवरील त्यांची टीका अत्यंत तीव्र होती. त्यांच्या काही राजकीय आणि सामाजिक भूमिकांवर त्या काळातही मतभेद झाले आणि आजही त्यांच्या विचारांवर विविध दृष्टिकोनांतून चर्चा केली जाते. त्यामुळे त्यांना अंधगौरवाच्या चौकटीत ठेवणे जितके अयोग्य आहे, तितकेच त्यांच्या संपूर्ण कार्याकडे दुर्लक्ष करणेही अयोग्य ठरेल. इतिहासातील समाजसुधारकांचे मूल्यमापन त्यांच्या काळातील परिस्थिती, त्यांनी उपस्थित केलेले प्रश्न, त्यांच्या कार्यपद्धती आणि समाजावर झालेला परिणाम या सर्वांचा विचार करून करणे आवश्यक आहे. पेरियारांच्या बाबतीतही अशी चिकित्सक दृष्टीच अधिक योग्य ठरते.आजच्या भारतात संविधानाने समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांना मूलभूत स्थान दिले आहे. अस्पृश्यता कायद्याने निषिद्ध आहे. स्त्री-पुरुष समानतेला घटनात्मक संरक्षण आहे. वंचित आणि मागासलेल्या समाजघटकांच्या प्रतिनिधित्वासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. तरीही सामाजिक जीवनात जातीय पूर्वग्रह, भेदभाव, स्त्रीविषमता, सामाजिक बहिष्कार आणि अंधश्रद्धेची विविध रूपे आढळतात. कायदे अस्तित्वात असूनही सामाजिक मानसिकता पूर्णपणे बदललेली नाही, ही वस्तुस्थिती लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यामुळे सामाजिक न्याय केवळ कायद्याच्या अंमलबजावणीचा प्रश्न नसून सामाजिक जाणीवेचाही प्रश्न आहे. याच ठिकाणी पेरियारांच्या विचारांचे समकालीन महत्त्व जाणवते.आजच्या डिजिटल युगात विवेकवादाची गरज अधिकच वाढली आहे. माहितीचा प्रसार काही क्षणांत होतो; परंतु प्रत्येक माहिती सत्य असेलच असे नाही. अफवा, खोटी माहिती, अंधश्रद्धा आणि पूर्वग्रह यांना तंत्रज्ञानामुळे अधिक वेगाने प्रसार मिळू शकतो. अशा परिस्थितीत नागरिकांनी प्रश्न विचारणे, माहितीची पडताळणी करणे आणि तर्कशुद्ध निष्कर्षापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. पेरियारांनी मांडलेला विवेकवाद आधुनिक काळात वैज्ञानिक दृष्टिकोन, चिकित्सक विचार आणि जबाबदार नागरिकत्वाशी जोडून पाहता येतो. लोकशाही केवळ मतदानावर टिकत नाही; ती विवेकशील आणि प्रश्न विचारणाऱ्या नागरिकांवरही टिकून राहते.पेरियारांच्या स्वाभिमानाच्या संकल्पनेचा आजच्या समाजासाठीही व्यापक अर्थ आहे. स्वतःचा सन्मान राखणे महत्त्वाचे आहेच; परंतु दुसऱ्या व्यक्तीच्या सन्मानाचे रक्षण करणे त्याहून महत्त्वाचे आहे. जात, धर्म, लिंग, भाषा किंवा आर्थिक परिस्थितीच्या आधारावर कोणत्याही व्यक्तीला कमी लेखणे हे मानवी प्रतिष्ठेच्या विरोधात आहे. स्वाभिमानाचा खरा अर्थ स्वतःला श्रेष्ठ समजण्यात नसून कोणालाही कनिष्ठ न मानण्यात आहे. सामाजिक समतेचा हा विचार लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांशी जोडलेला आहे. म्हणून पेरियारांचा स्वाभिमानाचा संदेश आज व्यक्तीच्या अधिकारांबरोबरच सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देतो.पेरियारांचे जीवन सामाजिक परिवर्तन ही दीर्घकालीन प्रक्रिया असल्याचे स्पष्ट करते. कायदे बदलणे आवश्यक असते; परंतु कायद्यापलीकडे समाजाची मानसिकता बदलणे तितकेच आवश्यक आहे. अस्पृश्यता कायद्याने गुन्हा ठरविता येते; परंतु मनातील जातीय पूर्वग्रह दूर करण्यासाठी शिक्षण आणि प्रबोधन आवश्यक असते. स्त्रीला समान अधिकार कायद्याने देता येतात; परंतु पितृसत्ताक विचार बदलण्यासाठी कुटुंब आणि समाजातील मानसिकतेत परिवर्तन घडवावे लागते. अंधश्रद्धेविरोधी भूमिका घेता येते; परंतु विवेकवादी समाज निर्माण करण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन आणि प्रश्न विचारण्याची सवय विकसित करावी लागते. सामाजिक परिवर्तन ही एकदाच पूर्ण होणारी घटना नसून पिढ्यान्पिढ्या पुढे नेण्याची प्रक्रिया आहे.१७ सप्टेंबर रोजी पेरियार जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनाचे स्मरण करताना त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील संघर्षशीलता, सामाजिक विषमतेविरुद्धची भूमिका आणि विवेकवादी विचार यांचा नव्याने विचार करणे आवश्यक आहे. त्यांच्या सर्व विचारांशी प्रत्येक व्यक्तीचे पूर्णतः मतैक्य असणे गरजेचे नाही. परंतु जातीय अन्याय, स्त्रीविषमता, सामाजिक बहिष्कार आणि अंधश्रद्धेविरुद्ध त्यांनी उपस्थित केलेले प्रश्न आजही समाजासमोर आहेत. त्यामुळे त्यांच्या विचारांकडे भावनिक गौरव किंवा भावनिक नकार यांच्या पलीकडे जाऊन चिकित्सक आणि सामाजिक न्यायाच्या दृष्टीने पाहणे अधिक उपयुक्त ठरेल.पेरियारांचे १९७३ मध्ये निधन झाले; परंतु स्वाभिमान, विवेकवाद आणि सामाजिक समतेशी संबंधित त्यांनी उपस्थित केलेले प्रश्न आजही जिवंत आहेत. त्यांच्या जयंतीचा खरा अर्थ केवळ त्यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात नाही, तर समाजातील अन्यायाकडे डोळसपणे पाहण्यात आहे. जन्मामुळे कोणताही मनुष्य श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नाही, प्रत्येक व्यक्तीला समान मानवी प्रतिष्ठा मिळाली पाहिजे, स्त्रीला समान अधिकार आणि निर्णयस्वातंत्र्य मिळाले पाहिजे, वंचित समाजघटकांना संधी व प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे आणि कोणत्याही विचाराचा स्वीकार करण्यापूर्वी त्याची विवेकाच्या कसोटीवर चिकित्सा झाली पाहिजे, हा त्यांच्या कार्यातून घेता येणारा व्यापक संदेश आहे. म्हणूनच १७ सप्टेंबर हा केवळ एका समाजसुधारकाच्या जन्मदिनाचे स्मरण करणारा दिवस न राहता सामाजिक आत्मपरीक्षणाचा दिवस ठरावा. स्वाभिमानाला विवेकाची जोड, विवेकाला मानवतेची जोड आणि मानवतेला सामाजिक समतेची दिशा मिळाली, तरच न्याय्य समाजाची निर्मिती शक्य होईल. माणसाच्या जन्मापेक्षा त्याची प्रतिष्ठा, परंपरेपेक्षा विवेक आणि विशेषाधिकारापेक्षा समानता महत्त्वाची मानणारी सामाजिक जाणीव निर्माण करणे हीच पेरियारांच्या स्मृतीला खरी आदरांजली ठरेल.



**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, मराठी व समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
bagate.rajendra5@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १६ सप्टेंबर २०२६

# मराठवाडा मुक्तिसंग्राम : स्वातंत्र्याची दुसरी पहाट

भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटिशांच्या दीर्घकाळ चाललेल्या राजवटीतून स्वातंत्र्य मिळाले. देशभर स्वातंत्र्याचा उत्सव साजरा झाला आणि भारतीय जनतेने परकीय सत्तेच्या जोखडातून मुक्त झाल्याचा आनंद व्यक्त केला. मात्र या स्वातंत्र्याची पहाट भारताच्या प्रत्येक प्रदेशात एकाच वेळी उगवली नाही. तत्कालीन हैदराबाद संस्थानातील मराठवाडा, तेलंगण आणि कर्नाटकातील काही प्रदेश अजूनही निजामाच्या अधिपत्याखाली होते. त्यामुळे ब्रिटिश सत्तेपासून भारत स्वतंत्र झाला असला, तरी या प्रदेशातील जनतेला निजामशाहीच्या राजवटीतून मुक्त होण्यासाठी आणखी एका संघर्षाला सामोरे जावे लागले. या संघर्षाचे अंतिम पर्व १७ सप्टेंबर १९४८ रोजी संपन्न झाले. हैदराबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाले आणि मराठवाड्याच्या जनतेला निजामाच्या राजवटीतून मुक्ती मिळाली. म्हणूनच १७ सप्टेंबर हा दिवस मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन म्हणून स्मरणात ठेवला जातो. हा दिवस केवळ एका ऐतिहासिक घटनेचे स्मरण करण्याचा दिवस नसून स्वातंत्र्य, लोकशाही, मानवी प्रतिष्ठा आणि राष्ट्रीय एकात्मतेसाठी लढलेल्या असंख्य ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाला अभिवादन करण्याचा दिवस आहे.हैदराबाद संस्थान हे तत्कालीन भारतातील सर्वांत मोठ्या संस्थानांपैकी एक होते. निजामाच्या अधिपत्याखालील या संस्थानात आजच्या तेलंगणाचा मोठा भाग, महाराष्ट्रातील संपूर्ण मराठवाडा आणि कर्नाटकातील काही प्रदेशांचा समावेश होता. निजामाची सत्ता स्वतंत्र भारताच्या राजकीय प्रक्रियेपासून वेगळी राहण्याचा प्रयत्न करीत होती. भारत स्वतंत्र झाल्यानंतर संस्थानांचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण हा राष्ट्रीय एकात्मतेचा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न बनला. अनेक संस्थानांनी भारतात विलीन होण्याचा निर्णय घेतला; मात्र हैदराबाद संस्थानाच्या बाबतीत परिस्थिती गुंतागुंतीची होती. निजामाला स्वतंत्र अस्तित्व टिकवून ठेवण्याची इच्छा होती. परिणामी भारतीय संघराज्यात सामील होण्याची मागणी करणाऱ्या जनतेचा संघर्ष अधिक तीव्र झाला.मराठवाड्यातील जनतेच्या संघर्षाची मुळे केवळ १९४७ नंतरच्या राजकीय परिस्थितीत शोधता येत नाहीत. निजामशाहीच्या काळात राजकीय स्वातंत्र्य, अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य, संघटन स्वातंत्र्य आणि शिक्षणाच्या संधी यांवर अनेक मर्यादा होत्या. सामान्य जनतेमध्ये असंतोष निर्माण होत होता. सामाजिक आणि आर्थिक विषमता, प्रशासनातील केंद्रीकरण आणि जनतेच्या राजकीय सहभागाचा अभाव यामुळे स्वातंत्र्याची आकांक्षा अधिक तीव्र होत गेली. भारतीय स्वातंत्र्यलढ्याने देशभरात निर्माण केलेली राष्ट्रीय जाणीव मराठवाड्यातही पोहोचली होती. भारतीय राष्ट्रध्वज, 'वंदे मातरम्'चा जयघोष आणि लोकशाही शासनव्यवस्थेची मागणी यांतून जनतेच्या मनातील परिवर्तनाची इच्छा स्पष्टपणे व्यक्त होत होती.हैदराबाद स्टेट काँग्रेसने या संघर्षाला संघटित स्वरूप देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. स्वामी रामानंद तीर्थ हे या आंदोलनातील प्रमुख नेते म्हणून पुढे आले. त्यांनी हैदराबाद संस्थानातील जनतेला लोकशाही अधिकारांसाठी संघटित करण्याचे काम केले. मराठवाड्यातील अनेक कार्यकर्त्यांनी या आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. गोविंदभाई श्रॉफ, विजयेंद्र काबरा, पी. एच. पाटवर्धन यांसारख्या कार्यकर्त्यांनी संघर्षाला दिशा दिली. त्यांच्या सोबत असंख्य कार्यकर्ते गावोगावी जनजागृती करीत होते. अनेकांनी तुरुंगवास भोगला, पोलिसांचा छळ सहन केला, आर्थिक संकटांना सामोरे गेले आणि आपल्या कुटुंबीयांपासून दूर राहून स्वातंत्र्याच्या लढ्यात योगदान दिले. या संघर्षाचा इतिहास केवळ काही नेत्यांचा इतिहास नसून सामान्य माणसाच्या धैर्याचा आणि त्यागाचा इतिहास आहे.मराठवाडा मुक्तिसंग्रामात ग्रामीण समाजाचा सहभाग विशेष महत्त्वाचा होता. गावातील शेतकरी, कामगार, विद्यार्थी, शिक्षक, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते आणि महिला यांनी आपल्या परीने आंदोलनाला पाठिंबा दिला. त्या काळात माहितीची साधने मर्यादित होती; तरीही स्वातंत्र्य आणि लोकशाहीची जाणीव लोकांपर्यंत पोहोचत होती. गावागावांतून कार्यकर्ते तयार झाले. अनेकांनी सरकारी दडपशाहीची पर्वा न करता राष्ट्रीय विचारांचा प्रचार केला. काहींनी भूमिगत राहून कार्य केले. काहींनी सत्याग्रह केले, तर काहींनी कारावास पत्करला. या सर्व प्रयत्नांतून निजामशाहीविरोधातील लोकमत अधिक व्यापक होत गेले.या काळातील परिस्थिती अधिक गंभीर बनविण्यात रझाकारांच्या हिंसक कारवायांचा मोठा वाटा होता. निजामाच्या सत्तेला पाठिंबा देणाऱ्या रझाकारांनी स्वातंत्र्य आणि भारतीय संघराज्यातील विलिनीकरणाची मागणी करणाऱ्या जनतेवर दडपशाही केली. अनेक भागांत भीतीचे वातावरण निर्माण झाले. सामान्य नागरिकांवर अत्याचार झाले. आंदोलनकर्त्यांना धमकावले गेले. त्यामुळे जनतेच्या मनातील असंतोष आणखी वाढला. या हिंसक वातावरणातही स्वातंत्र्याची मागणी मागे घेण्यास अनेक कार्यकर्ते तयार नव्हते. स्वातंत्र्य हा त्यांच्यासाठी केवळ राजकीय अधिकार नव्हता, तर तो मानवी प्रतिष्ठेचा प्रश्न बनला होता.भारत सरकारसमोर हैदराबाद संस्थानाचा प्रश्न दिवसेंदिवस अधिक गंभीर होत गेला. भारताची भौगोलिक आणि राजकीय एकात्मता टिकविण्यासाठी संस्थानांचे विलीनीकरण आवश्यक होते. तत्कालीन उपपंतप्रधान आणि गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी संस्थानांच्या भारतातील विलीनीकरणात निर्णायक भूमिका बजावली. हैदराबाद संस्थानाच्या प्रश्नावर चर्चा आणि वाटाघाटींचे प्रयत्न झाले; मात्र परिस्थितीत अपेक्षित तोडगा निघाला नाही. अखेर भारत सरकारने सप्टेंबर १९४८ मध्ये लष्करी कारवाई करण्याचा निर्णय घेतला. १३ सप्टेंबर १९४८ रोजी सुरू झालेल्या या कारवाईला 'ऑपरेशन पोलो' असे नाव देण्यात आले. काही दिवसांच्या कारवाईनंतर निजामाने शरणागती पत्करली आणि १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाले.१७ सप्टेंबर हा त्यामुळे मराठवाड्याच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा दिवस ठरला. मात्र या दिवसाचा अर्थ केवळ लष्करी कारवाईच्या यशापुरता मर्यादित ठेवणे योग्य ठरणार नाही. त्यामागे अनेक वर्षे चाललेला जनसंघर्ष, कार्यकर्त्यांचे त्याग, जनजागृती, सत्याग्रह, कारावास आणि सामान्य जनतेच्या स्वातंत्र्याच्या आकांक्षा होत्या. भारतीय सैन्याच्या कारवाईने मुक्तीची निर्णायक प्रक्रिया पूर्ण केली; परंतु त्यासाठी पोषक वातावरण तयार करणाऱ्या जनआंदोलनाचे योगदान तितकेच महत्त्वाचे होते. म्हणून मराठवाडा मुक्तिसंग्रामाची गाथा सांगताना राजकीय नेतृत्वासोबतच सामान्य जनतेच्या सहभागाचे स्मरण करणे अत्यावश्यक आहे.मुक्तिसंग्रामाचे महत्त्व केवळ निजामशाहीच्या अंतामध्ये नाही, तर त्यातून निर्माण झालेल्या लोकशाहीच्या नव्या पर्वात आहे. राजकीय सत्ता ही जनतेच्या संमतीवर आधारित असावी, नागरिकांना समान अधिकार मिळावेत, कायद्यापुढे सर्व समान असावेत आणि शासन जनतेप्रती उत्तरदायी असावे, ही लोकशाहीची मूलभूत तत्त्वे आहेत. निजामशाहीच्या राजवटीविरुद्ध संघर्ष करणाऱ्या जनतेच्या आकांक्षांना पुढे भारतीय संविधानाने व्यापक आणि संस्थात्मक अधिष्ठान दिले. म्हणूनच मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा इतिहास संविधानाच्या मूल्यांशी जोडून समजून घेणे आवश्यक आहे.भारतीय संविधानाने स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता या मूल्यांना सर्वोच्च स्थान दिले. आज आपण या मूल्यांचा उपभोग घेत असलो, तरी त्यांचे संरक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. मुक्तिसंग्रामात ज्यांनी संघर्ष केला, त्यांनी पुढील पिढ्यांसाठी अधिक चांगल्या समाजाचे स्वप्न पाहिले होते. त्यामुळे त्यांच्या त्यागाचे स्मरण केवळ पुष्पहार अर्पण करून किंवा शासकीय कार्यक्रम आयोजित करून पूर्ण होत नाही. त्यांच्या स्वप्नातील समाज निर्माण करण्यासाठी सामाजिक विषमता कमी करणे, शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचविणे, महिलांना समान संधी देणे, वंचित घटकांच्या अधिकारांचे संरक्षण करणे आणि लोकशाही संस्थांना अधिक सक्षम करणे आवश्यक आहे.मराठवाड्याच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाचा प्रश्नही या संदर्भात महत्त्वाचा आहे. मुक्तीनंतरच्या काळात या प्रदेशाने शिक्षण, शेती, उद्योग, आरोग्य, वाहतूक आणि सामाजिक क्षेत्रात लक्षणीय प्रगती केली. अनेक शैक्षणिक संस्था उभ्या राहिल्या. उच्च शिक्षणाच्या संधी वाढल्या. उद्योग आणि सेवा क्षेत्राचा विस्तार झाला. तरीही मराठवाड्यापुढे पाणीटंचाई, शेतीची अनिश्चितता, बेरोजगारी, स्थलांतर, ग्रामीण दारिद्र्य, आरोग्यविषयक अडचणी, औद्योगिक मागासलेपणा आणि प्रादेशिक असमतोल यांसारखी आव्हाने कायम आहेत. त्यामुळे राजकीय मुक्तीनंतर सामाजिक आणि आर्थिक विकासाची नवी लढाई सुरू ठेवणे आवश्यक आहे.आजच्या पिढीने मराठवाडा मुक्तिसंग्रामाकडे केवळ गौरवाच्या दृष्टिकोनातून पाहू नये, तर त्यातून प्रेरणा घ्यावी. त्या काळातील लोकांनी आपल्या अधिकारांसाठी आवाज उठविला. आज आपल्या हातात संविधानाने दिलेले मतदानाचे, अभिव्यक्तीचे, शिक्षणाचे आणि समानतेचे अधिकार आहेत. या अधिकारांचा जबाबदारीने वापर करणे हे मुक्तिसंग्रामातील वारशाचे जतन करण्यासारखेच आहे. लोकशाहीमध्ये नागरिकांची भूमिका केवळ मतदान करण्यापुरती मर्यादित नसते. सार्वजनिक प्रश्नांवर जागरूक राहणे, प्रशासनाकडून पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाची अपेक्षा करणे, सामाजिक अन्यायाविरुद्ध आवाज उठविणे आणि संविधानिक मार्गाने परिवर्तनासाठी प्रयत्न करणे हीदेखील नागरिकांची कर्तव्ये आहेत.मुक्तिसंग्रामाच्या इतिहासाचे जतन करण्याची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे. अनेक स्वातंत्र्यसैनिकांच्या आठवणी, पत्रे, छायाचित्रे, दस्तऐवज आणि मौखिक इतिहास अजूनही स्थानिक पातळीवर विखुरलेला आहे. त्याचे शास्त्रीय पद्धतीने संकलन आणि संवर्धन झाले पाहिजे. प्रत्येक जिल्ह्यातील आणि गावातील मुक्तिसंग्रामाशी संबंधित इतिहास शोधून काढणे आवश्यक आहे. शाळा-महाविद्यालयांमध्ये स्थानिक इतिहासाच्या अभ्यासाला प्रोत्साहन मिळाले पाहिजे. ज्यांनी प्रत्यक्ष संघर्ष केला त्यांच्या कुटुंबीयांच्या आठवणी नोंदवून ठेवणे आवश्यक आहे. इतिहास हा केवळ पाठ्यपुस्तकातील काही तारखा आणि घटनांचा संग्रह नसतो; तो समाजाच्या सामूहिक स्मृतीचा महत्त्वपूर्ण भाग असतो.मराठवाडा मुक्तिसंग्रामाची आठवण करताना समाजात कोणत्याही प्रकारचा द्वेष निर्माण होऊ नये, हीदेखील काळाची गरज आहे. इतिहासाचे स्मरण हे वर्तमानातील सामाजिक सलोखा मजबूत करण्यासाठी झाले पाहिजे. हा संघर्ष अन्याय, दडपशाही आणि लोकशाहीच्या अभावाविरुद्ध होता. त्यामुळे त्यातून मिळणारा संदेश हा मानवता, स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेचा असला पाहिजे. कोणत्याही धर्म, जात किंवा भाषिक समूहाविषयी द्वेष निर्माण करण्याऐवजी लोकशाही मूल्यांवर आधारित समाजनिर्मितीला प्राधान्य दिले पाहिजे. इतिहासाचा उपयोग विभाजनासाठी नव्हे, तर समाजाला एकत्र आणण्यासाठी झाला तरच त्याचे स्मरण सार्थ ठरेल.आज मराठवाड्याच्या विकासाचा विचार करताना येथील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचविणे ही खरी गरज आहे. ग्रामीण शेतकरी, महिला, कामगार, विद्यार्थी, आदिवासी, भटके-विमुक्त, दिव्यांग व्यक्ती, वृद्ध आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणणे म्हणजे आधुनिक अर्थाने सामाजिक मुक्तीची वाटचाल होय. स्वातंत्र्याचा अर्थ केवळ राजकीय सत्ता बदलणे नसून प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने, सुरक्षितपणे आणि समान संधींसह जगता येणे हा आहे. त्यामुळे मुक्तिसंग्रामाच्या स्मृतीला विकासाच्या आणि सामाजिक न्यायाच्या ध्येयाशी जोडणे आवश्यक आहे.१७ सप्टेंबरचा दिवस आपल्याला एक महत्त्वाचा प्रश्न विचारतो की आपल्याला मिळालेल्या स्वातंत्र्याचा आपण किती जबाबदारीने उपयोग करीत आहोत? ज्यांनी निजामशाहीविरुद्ध संघर्ष केला, त्यांनी लोकशाही आणि स्वाभिमानासाठी त्याग केला. आज आपल्यासमोरची आव्हाने वेगळी आहेत. सामाजिक विषमता, आर्थिक असमानता, बेरोजगारी, पर्यावरणीय संकट, शिक्षणातील विषमता, डिजिटल दरी आणि सार्वजनिक जीवनातील उदासीनता या नव्या समस्या आहेत. या समस्यांविरुद्ध संविधानिक मार्गाने आणि लोकशाही पद्धतीने संघर्ष करणे हीच आजच्या पिढीची जबाबदारी आहे.मराठवाडा मुक्तिसंग्रामाची खरी शिकवण अशी आहे की, अन्याय कितीही दीर्घकाळ टिकला तरी जनतेची स्वातंत्र्याची आकांक्षा दडपता येत नाही. संघटित जनशक्ती, धैर्य, त्याग आणि लोकशाही मूल्यांवरील विश्वास यांच्या बळावर परिवर्तन घडवून आणता येते. १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामशाहीचा अंत होऊन मराठवाड्याच्या इतिहासात स्वातंत्र्याची नवी पहाट उगवली. त्या पहाटेचा प्रकाश पुढील पिढ्यांच्या जीवनात अधिक व्यापक करण्याचे काम आज आपल्याला करायचे आहे.म्हणूनच मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन हा केवळ उत्सवाचा किंवा औपचारिक अभिवादनाचा दिवस न राहता आत्मपरीक्षणाचा दिवस झाला पाहिजे. ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण करून त्यांच्या संघर्षातून मिळालेली स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता आणि लोकशाहीची मूल्ये आपल्या सार्वजनिक आणि वैयक्तिक जीवनात रुजविण्याचा संकल्प केला पाहिजे. मराठवाड्याचा इतिहास आपल्याला संघर्षाची प्रेरणा देतो, तर भारतीय संविधान आपल्याला परिवर्तनाचा मार्ग दाखवते. या दोन्हींच्या संगमातून अधिक न्याय्य, समताधिष्ठित, संवेदनशील आणि विकसित मराठवाड्याची निर्मिती करणे हीच १७ सप्टेंबरच्या मुक्तिसंग्राम दिनाची खरी आदरांजली ठरेल. स्वातंत्र्यसैनिकांनी ज्या स्वाभिमानासाठी संघर्ष केला, तो स्वाभिमान प्रत्येक नागरिकाच्या जीवनात दिसला, लोकशाही प्रत्येकाच्या दारापर्यंत पोहोचली आणि विकासाचा लाभ समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचला, तरच मराठवाडा मुक्तिसंग्रामाची गाथा खऱ्या अर्थाने सार्थकी लागेल.



**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

**bagate.rajendra5@gmail.com**